रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १९८ । पृष्ठे ८▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in




रायगड, गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## राणेंसह दोन आमदारांविरुद्ध वॉरंट

सिंधुदुर्ग : कोरोना कालावधीतील एका आंदोलनप्रकरणी कुडाळ न्यायालयाने भाजपच्या तीन नेत्यांना चांगलंच धारेवर धरलं आहे. मंत्री नितेश राणे, आमदार प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांना कुडाळ न्यायालयाने दणका दिला. राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांना कुडाळ न्यायालयाकडून अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आलं आहे. संविधान बचाव आंदोलन केल्याप्रकरणी आमदार प्रविण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांनाही अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आलं आहे.

## वे|ध|क

### शासकीय कर्मचाऱ्याची आत्महत्या

**अलिबाग :** अलिबागमधील तिनविरा धरणात एका व्यक्तीने आत्महत्या केली. त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सकाळी घडली. शासकीय कर्मचाऱ्याने धरणात आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विजय काकडे असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. अलिबागमधील पिंपळभाट येथील रहिवासी असून तो कर्जतमध्ये जलसंधारण विभागात कालवा निरीक्षक या पदावर कार्यरत होता. त्यांच्याकडे पनवेलमधील मोरबे, बामणोली येथील धरणांची सिंचन वसूलीचे काम होते. बुधवारी सकाळी त्याचा मृतदेह धरणामध्ये आढळून आला.

### प्रेमसंबंधातून तरुणाचा खून

**पुणे :** प्रेमप्रकरणातून तरुणाचा धारधार शस्त्राने वार करून दोघांनी खून केला. जावेद खाजामियाँ पठाण (वय ३४, ख्वाजानगर, शनी मंदिराजवळ, भोकर, जि. नांदेड) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी संदीप रंगराव भुरके (वय २५) याच्यासह त्याच्या साथीदाराविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत रौफ उस्मान शेख (वय ३५, सध्या रा. भूमकर चौक, नऱ्हे, मूळ रा. ख्वाजानगर, भोकर, जि. नांदेड) याने फिर्याद दिली आहे. ही घटना २२ डिसेंबर रोजी सायंकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास गुरूदत्त वॉशिंग सेंटर गायमुख चौक आंबेगाव परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खून झाललेला तरुण

### गोवंडीत एमडी जप्त, दोघांना अटक

**मुंबई :** अमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी आलेल्या दोन आरोपींना शिवाजी नगर पोलिसांनी मंगळवारी रात्री पाठलाग करून अटक केली. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपीना अटक केली. शिवाजी नगर पोलिस गोवंडी परिसरात मंगळवारी रात्री गस्त घालत होते. त्यावेळी देवनार कचाराभूमी परिसरात दोन व्यक्ती संशयास्पद फिरत असल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांनी तात्काळ त्यांना थांबण्याचा इशारा केला. अरबाज खान आणि शहबाज खान अशी या आरोपींची नावे असून दोघेही गोवंडी परिसरातील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे दहा लाख रुपये किमतीचे एमडी सापडले. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपीना ताब्यात घेतले.

### थेट नगराध्यक्षांना मताचा अधिकार

मुंबई : आगामी महापालिका निवडणुकांची घोषणा झाल्याने राज्यातील सर्वच जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे, जनतेला थेट लाभ मिळेल अशा कुठल्याही घोषणा करण्यावर किंवा निर्णय घेण्यावर निर्बंध आले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. कॅबिनेट बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळणार, तसेच मताचाही अधिकार आहे.

# ‘अनधिकृत’चे 39 कोटी थकले

प्रमोद जाधव

। रायगड ।

**शेतजमिनीचा अकृषक वापर करून जिल्ह्यामध्ये एक हजार ६५३ जणांनी अनधिकृत बांधकाम केल्याची माहिती समोर आली आहे. या आकडेवारीनुसार रायगड जिल्ह्याला अनधिकृत बांधकामाचा विळखा असल्याचे स्पष्ट झाले आहे. बिनशेती शोध मोहिमेअंतर्गत महसूल विभागाने मार्च २०२५ अखेर पर्यंत फक्त सात कोटी ९६ लाख रुपयांचा दंड या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून वसूल केला आहे. उर्वरित ३९ कोटी ५० लाख ९१ हजार सात रुपयांचा दंड वसूल करण्यास ही यंत्रणा उदासीन ठरल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.**

रायगड जिल्ह्यात पर्यटन वाढत असताना औद्योगिकरणदेखील झपाट्याने वाढत आहे. वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबरच

- **जिल्ह्यात विनापरवानगी १० हजार ६५३ बांधकामे, केवळ ७ कोटींची वसूली**
- **शेतजमीनीचा अकृषक वापर करणाऱ्यांना महसूलचा दणका**
- **बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांकडून फक्त सात कोटी रुपये वसूल**

नागरिकीकरणामुळे रायगड जिल्ह्यामध्ये जमिनीचे दर वाढू लागले आहे. पनवेल, अलिबाग, खालापूर, कर्जत या भागातील जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे जमिनीला सोन्यापेक्षाही महत्व प्राप्त झाले आहे. मोठ-मोठ्या शहरात राहणारे काही धनदांडगी मंडळी अलिबाग, मांडवा, रोहा, माणगाव, मुरूड, काशिद, कर्जत, खालापूर, पनवेल, पेण या भागात जमिनी खरेदी करून आपले त्याठिकाणी बस्तान मांडत आहे. शेकडो- हजारो एकर जमिनी घेऊन त्याठिकाणी फार्महाऊस बांधण्यावर अधिक भर दिला जात आहे. धावपळीच्या युगामध्ये डोंगरभागात, निसर्गाच्या सानिध्यात लहान - मोठे घर बांधून राहण्यास पसंती दिली जात आहे. दिवसेंदिवस ही क्रेझ वाढू लागली आहे. शेत जमिनी विकत घेऊन त्या जागेत अकृषक वापरासाठी बांधकाम ठिकठिकाणी केले जात आहे. शेत जमीनीत बांधकाम करण्यासाठी त्याची महसूल विभागाकडून परवानी घ्यावी लागते. बिनशेती करण्यासाठी वेगवेगळ्या २१ विभागात फाईल पोहोचवावी लागले. त्यासाठी खर्चही प्रचंड होतो. तसेच धावपळही मोठ्या प्रमाणात होते.

•> पान २ वर



| | |
|---|---|
| पनवेल | 4,73,34,822 |
| उरण | 73,22,246 |
| कर्जत | 3,00,56,374 |
| खालापूर | 14,24,45,047 |
| पेण | 5,08,45,391 |
| अलिबाग | 5,50,90,099 |
| मूरूड | 71,66,950 |
| रोहा | 34,92,136 |
| सुधागड | 74,76,058 |
| माणगांव | 2,70,81, 569 |
| तळा | 11,36,968 |
| श्रीवर्धन | 1, 15,85,045 |
| म्हसळा | 33, 02,195 |
| महाड | 5,22, 092 |
| पोलादपूर | 2,35,015 |

थकीत वसूलीवर दृष्टीक्षेप
एकूण 39,50,91,007

### अनधिकृत बांधकामात तीन तालुके आघाडीवर

रायगड जिल्ह्यात दहा हजार ६५३ जणांनी अनधिकृत बांधकाम केले आहे. यामध्ये पनवेलमध्ये ८८६, उरणमध्ये ३७६, कर्जतमध्ये १०७१, खालापूरमध्ये ५८९, पेणमध्ये ६६५, अलिबागमध्ये १३२८, मुरूडमध्ये ४७९, रोहामध्ये २६४, सुधागडमध्ये ५७१, माणगांवमध्ये २६५९, तळामध्ये६४, श्रीवर्धनमध्ये ५७१, म्हसळामध्ये ६१८, महाडमध्ये ३९४, आणि पोलादपूरमध्ये ११८ जणांनी जमिनीचा अकृषक वापर केल्याची माहिती समोर आली आहे. त्यात माणगाव, अलिबाग, कर्जत हे तीन तालुके अनधिकृत बांधकाम करण्यास आघाडीवर असल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.

# ठाकरे बंधूंची युतीची घोषणा

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्या युतीची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याकडून युतीचे संकेत देण्यात आले होते.

आता महापालिकेच्या निवडणुकीच्यापार्श्वभूमीवरशिवसेना ठाकरे गट आणि मनसेनं युती केली आहे. युतीची घोषणा करण्याआधी ठाकरे बंधूंनी शिवतीर्थावर जाऊन बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतीस्थळी अभिवादन केलं.



राज ठाकरे म्हणाले की, कुठल्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. त्या सभेतून त्या वाक्यापासून एकत्र येण्याची सुरुवात झाली. कोण किती जागा लढणार, आकडा काय हे सांगणार नाही. महाराष्ट्रात लहान मुलं पळवणाऱ्या टोळ्या पळतायत. त्यात दोन टोळ्या आणखी ॲड झाल्यात. ते राजकीय पक्षातली मुलं पळवात. जे निवडणुका लढवणार आहेत. त्या लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना दोन्ही पक्षांकडून उमेदवारी दिली जाईल. ती कधी भरायची आणि कशी ते कळवलं जाईल. आज एकच सांगेन की बरेच दिवस प्रतिक्षा करत होता ती शिवसेना आणि मनसेची युती झाली हे जाहीर करतो.

उद्धव ठाकरे म्हणाले की, राऊतांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची आठवण करून दिली. १०७ पेक्षा जास्त मराठी माणसांनी बलिदान देऊन मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली. त्याची आठवण आज होणं स्वाभाविक आहे. आम्ही आज ठाकरे बंधू इथं बसलो आहोत.

अखख ठाकरे घराणं त्यावेळी संघर्ष करत होतं. मुंबई महाराष्ट्राने मिळवल्यानंतर मुंबईतच मराठी माणसाच्या उरावर नाचायला लागले. त्यावेळी न्याय हक्कासाठी शिवसेना प्रमुखांनी शिवसेनेला जन्म दिला.

पुढच्या वर्षी शिवसेनेला ६० वर्षे होतील. आज पुन्हा आपण मुंबईचे लचके तोडणं, चिंधड्या उडवायच्या हे मनसुबे त्यावेळी ज्यांना मुंबई पाहिजे होती त्यांचेच प्रतिनिधी दिल्लीत जे बसलेत त्यांचे आहेत. आता जर

•> पान २ वर

# आमदारांचा मुरुडकरांवर अविश्वास

## जिल्हा परिषदेसाठी अलिबागचा दिला उमेदवार

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुरुड नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवार कल्पना पाटील यांचा जिव्हारी पराभव झाला असून, या निकालामुळे मुरुड तालुक्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

निवडणूक निकाल जाहीर होताच स्थानिक पातळीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. मंगळवारी (दि.२३) आमदारांनी मुरुडमधील काही स्थानिक नेत्यांना उघडपणे लाखोल्या वहिल्या. तसेच जिल्हा परिषदेला उमेदवार म्हणून नोकर देतोय, असे सांगत तो पडला तर याद राखा, अशा धमकीवजा वक्तव्यामुळे निवडणूक प्रक्रियेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याची



चर्चा मतदारांमध्ये रंगली होती. या वक्तव्यामुळे मुरुडमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

मुरुडमध्ये शिंदे गटाचे अनेक दिग्गज आणि निष्ठावंत कार्यकर्ते असताना अलिबागच्या उमेदवाराला मुरुडमध्ये उभं करणार असल्याच्या आमदारांच्या निर्णयामुळे मुरुडकरांवर आमदारांचा विश्वास राहिला नसल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत प्रचारादरम्यान दमदाटी, आर्थिक देवाणघेवाण आणि राजकीय दबाव याचे आरोप सातत्याने ऐकू येत होते. विरोधकांकडून हा मुद्दा जोरदारपणे मांडण्यात आला होता. त्याचा परिणाम थेट मतदानावर झाला असून, शिवसेनेच्या उमेदवार कल्पना पाटील यांना पराभव पत्करावा लागल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. या पराभवामुळे मुरुडमधील शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, येत्या काळात पक्षांतर्गत आत्मपरीक्षण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दुसरीकडे, विरोधी गटाने हा निकाल दबावाच्या राजकारणाला मतदारांनी दिलेला नकार असल्याचा दावा केला आहे. निवडणूक काळात दिलेल्या धमकी, आरोप आणि आर्थिक व्यवहारांच्या चर्चेमुळे या निवडणुकीकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले होते.

आता निकालानंतर या सर्व बाबींची चौकशी होणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. मुरुड बाहेरचा उमेदवार मुरुडकरांवर लादण्यात येणार असून आमदाराच्या दबावाखाली त्याचे काम निमूटपणे करण्याची नामुष्की मुरुडमधील इच्छुक उमेदवारांवर आली आहे.

# दहावी-बारावी परीक्षेवर करडी नजर

। रायगड। प्रतिनिधी ।

इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा पूर्णत: कॉपीमुक्त होण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ठोस नियोजन केले आहे. सर्व केंद्रांना वॉल कंपाऊंड असणार आहे. परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे असतील. याशिवाय केंद्रावरील प्रत्येक पर्यवेक्षकाचा मोबाईल झूम ॲपच्या माध्यमातून जिल्ह्याच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात असणाऱ्या परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार नियोजन सुरू असून रायगड जिल्हा परीषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी सज्ज झाला आहे.

यंदाच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यात ७५ केंद्रे असणार आहेत. दुसरीकडे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची ५२ परीक्षा केंद्रे आहेत. बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक २३ जानेवारीपासून सुरु होईल. तत्पूर्वी, प्रत्येक परीक्षा केंद्राची गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली आहे. ज्या केंद्रांवर किंवा वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते, त्याठिकाणी बसविण्याचे आदेश देण्यात आले. वॉल कंपाऊंड तुटलेले होते, त्याठिकाणी तारेचे कपांऊंड मारण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या

•> पान २ वर

- **पर्यवेक्षकांच्या मोबाईलचे सुरु राहणार कॅमेरे**
- **यंदा प्रथमच पर्यवेक्षकांची सरमिसळ**

### जिल्हाधिकाऱ्यांचेही असणार परीक्षेवर लक्ष

इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त होणार आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. वॉल कंपाऊंड असलेल्याच केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षकांना पेपर संपेपर्यंत झूमच्या माध्यमातून त्यांच्या मोबाईलचे कॅमेरे सुरु ठेवावे लागणार आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या नियंत्रण कक्षातून जिल्हाधिकारी परीक्षेवर लक्ष ठेवणार आहेत.



## दुसऱ्या दिवशी १९४ उमेदवारी अर्जांची विक्री

। पनवेल । प्रतिनिधी ।

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पनवेल सार्वत्रिक निवडणूक बुधवार, १५ जानेवारी रोजी होत आहे, तर मतमोजणी व निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर होणार आहे.

निवडणूक प्रक्रियेचा पहिला महत्त्वाचा टप्पा असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेला मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. नामनिर्देशन पत्र विक्रीच्या पहिल्या दिवशी एकुण २३३ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली होती. २४ डिसेंबर

•> पान २ वर

# रोह्यात बिबट्या आढळल्याच्या अफवा

। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील विविध भागांमध्ये बिबट्या आढळल्याच्या बातम्या गेल्या अनेक दिवसांपासून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून सातत्याने व्हायरल होत आहेत. कधी एका जंगलात तर कधी दुसऱ्या ठिकाणी बिबट्या दिसल्याचे संदेश सोशल मीडियावर पसरवले जात असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र आज वनविभागाने या सर्व अफवांबाबत अधिकृत स्पष्टीकरण देत रोहा तालुक्यात कुठेही बिबट्या आढळलेला नाही, असे स्पष्ट केले आहे.

सध्या सोशल मीडियावर फिरत असलेले फोटो व संदेश हे खोटे व दिशाभूल करणारे आहेत. विशेषतः खारी येथील असल्याचे सांगत जो फोटो व्हायरल झाला, तो एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला



असून तो व्हायरल करणाऱ्या व्यक्तीवर सायबर गुन्हे सेलमध्ये गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती तालुका वनविभागाचे मुख्य अधिकारी दबडे यांनी दिली.

दरम्यान, वनविभागाने नागरिकांना योग्य दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन करत सांगितले की, बिबट्या आढळणे ही भीतीची नव्हे तर पर्यावरणीय दृष्ट्या सकारात्मक बाब आहे. बिबट्याची उपस्थिती म्हणजे निसर्गातील अन्नसाखळी व जैवविविधतेचे संवर्धन टिकून असल्याचे द्योतक असून वन्यजीवांचे संरक्षण अधिक सक्षम असल्याचे सूचित करते. तसेच, रोहा तालुक्यातील ऐनवल येथे बैलाचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यामुळे झाल्याची बातमीही व्हायरल झाली होती. मात्र या घटनेत बिबट्याचा सहभाग असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नाही, अशी माहिती वनविभागाने दिली असून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. संबंधित शेतकऱ्याला वनविभागाच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यात येईल, असेही आश्वासन देण्यात आले आहे.

वनविभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतेही अप्रमाणित फोटो किंवा संदेश पुढे पाठवू नयेत. खोटी माहिती पसरवणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

**सिडकोचे सर्वात महत्त्वाकांक्षी स्वप्न साकार | पहिल्याच दिवशी ३० उड्डाणे होणार**

# नवी मुंबईतून आज प्रवासी विमान झेपावणार

। पनवेल । प्रतिनिधी ।

अनेक दशकांची प्रतीक्षा, नियोजन, संघर्ष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिपाक अखेर प्रत्यक्षात उतरत आहे. २५ डिसेंबर २०२५ म्हणजे नाताळ सणाच्या साक्षीने नवी मुंबईच्या आकाशात पहिले प्रवासी विमान झेपावणार असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रत्यक्ष सेवेत दाखल होणार आहे. सिडकोचे सर्वात महत्त्वाकांक्षी स्वप्न साकार करणारा हा क्षण केवळ नवी मुंबई, पनवेलपुरता मर्यादित न राहता, देशाच्या पायाभूत विकासाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी

•> पान २ वर

**पहिल्या दिवशीची उड्डाणे (२५ डिसेंबर)**

इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, आकासा एअर आणि स्टार एअर या विमान कंपन्यांची सेवा सुरू होणार आहे.

**एकूण ३० एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्ससह विमानतळाचे संचालन सुरू होणार**



- पहिले आगमन
  ६ई४६० (बेंगळुरूहून) सकाळी ८ वाजता
- पहिले प्रस्थान
  ६ई८८२ (हैदराबादकडे) सकाळी ८.४० वाजता

“नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संचालनास प्रारंभ होणे हे महाराष्ट्र शासन व सिडकोची पायाभूत सुविधा विकासाबाबतची सातत्यपूर्ण बांधिलकी अधोरेखित करते. हा प्रकल्प सिडकोच्या बांधिलकीची हमी देत असून भविष्योन्मुख पायाभूत सुविधा, सर्वसमावेशक विकास आणि जागतिक स्तरावरील कनेक्टिव्हिटीसाठी आमची कटिबद्धता अधोरेखित करतो. या प्रवासात विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे हे सामूहिक यश आहे.”

-विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ

# विमानसेवेला भूमिपुत्रांनी निषेध नोंदवावा

## खा. सुरेश म्हात्रे यांचे आवाहन

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई विमानतळावरुन २५ डिसेंबर, उद्यापासून विमानसेवेला सुरुवात होत आहे. परंतू, अद्यापही विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात आलेले नाही. यामुळे भूमीपुत्रांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यामुळे सुरु होणाऱ्या या विमानसेवेच्या निषेधार्थ भूमिपुत्रांनी आपापल्या गावात एकत्र येऊन गावाच्या प्रवेशद्वार, गावदेवीचे मंदिर, चावडी किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शांततेच्या मार्गाने काळा झेंडा दाखवून निषेध नोंदवण्याचे आवाहन खा. सुरेश म्हात्रे यांनी केले आहे.

नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणावरुन अनेक वाद, आंदोलने, मोर्चा झाले. या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे, यासाठी भूमिपूत्र सुरुवातीपासून आग्रही आहेत. तसेच काही राजकीय नेतेदेखील या नावासाठी आग्रही आहेत. परंतू, विमानतळाच्या नामकरणाचा निर्णय प्रलंबित असतानाही २५ डिसेंबर, उद्यापासून या विमानतळावरुन व्यावसायिक विमानसेवा नियमित सुरु केली जात आहे. यामुळे भूमिपुत्रांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.नवी मुंबई विमानतळाला

•> पान २ वर

# प्रशासनावर सुशासनाची जबाबदारी

## • जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देश; सुशासन सप्ताह जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने देशव्यापी सुशासन सप्ताह सुरु केला आहे. प्रशासन जनतेसाठी काय करते याची माहिती व्हावी, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वसामान्य जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करून देवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. एकूणच जिल्हाधिकारी रायगड यांनी प्रशासनावर सुशासनाची जबाबदारी असल्याचे सांगून अधिकारी वर्गाला कर्तव्याची जाणीव करून दिली.




सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कार्यशाळा आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रायगडचे माजी जिल्हाधिकारी एच.के.जावळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, शहरीकरण जरी वाढत असले, तरी गावांमध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ राहत असतात. येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, हे आपले प्रमुख काम आहे. त्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करणे, सार्वजनिक तक्रारी निर्गत करणे, ऑनलाईन सेवेमधील विलंबितता टाळून त्या पुरविणे आदी कामे गतीने करावीत. आपल्याकडे आलेल्या नागरिकांच्या वैयक्तिक किंवा सामाजिक समस्या व्यवस्थितपणे ऐकून घेत त्यांना प्रत्येक अधिकारी,कर्मचाऱ्यांने हसतमुखाने उत्तर देवून त्यांच्या समस्यांचे निराकरण करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. आपण लोकांसाठी आहोत याची जाणीव प्रत्येकाला असणे तितकेच महत्वाचे आहे.

आपल्याला जे पद मिळाले आहे त्या पदाचा उपयोग सर्व सामान्य जनतेच्या कामासाठी वापरले पाहिजे. प्रत्येकाने काम काज केल्यानंतर त्याचे लिखाण करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासन गाव की ओर ही एक अतिशय महत्वाची थिम असून अधिकारी, कर्मचाऱ्यांना चांगले काम करण्याची संधी आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी रायगड एच.के. जावळे मार्गदर्शन करताना म्हणाले, केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा केंद्र शासनाचा स्तुत्य उपक्रम असून कामकाज करताना पारदर्शकता असली पाहिजे आणि कामकाज विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी वाड्या, वस्त्या असून शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत त्यांच्या असलेल्या समस्या संवाद सेतू या उपक्रमातून सोडविण्यावर भर द्यावा, असेही निर्देशही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

या उपक्रमात सार्वजनिक सेवेचे वितरण, तक्रार निवारण, पारदर्शकता या तीन महत्वाच्या बाबी आहेत. कायदा व व्यवहाराची सांगड घालून तसेच मानवी दृष्टीकोन व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून जनतेचे प्रश्न सोडवावेत. प्रशासकीय सेवा करताना आपण गोरगरीब जनतेची सेवा करतो त्याचे पुण्य आपल्याला नक्कीच मिळत

या कार्यशाळेवेळी प्रत्येक शासकीय विभागांनी जिल्ह्यात सुशासन उपक्रमांतर्गत राबविलेल्या योजनांची माहिती सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दाखविण्यात आली.

# घशाच्या संसर्गात वाढ

## • हवाळ्यातील थंड हवा, विषाणूजन्य संसर्गामुळे समस्या

**। रायगड । प्रतिनिधी ।**

हिवाळ्याच्या दिवसांमध्ये मुंबई शहरात घशाचा संसर्ग ही एक चिंतेची बाब ठरत आहे. सर्व वयोगटांमधील रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घसा दुखणे, गिळण्यास त्रास, सततचा खोकला आणि घशात जळजळ असा त्रास होत आहे.

हिवाळ्यातील थंड हवा, तापमानातील अचानक बदल आणि विषाणूंचा वाढता प्रादुर्भाव यामुळे घसा अधिक संवेदनशील बनतो तसेच प्रदूषणामुळे लक्षणे आणखी वाढतात.

अनेक व्यक्ती सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे दीर्घकाळ अस्वस्थता आणि वारंवार संक्रमणाचा धोका वाढतो. गुंतागुंत टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिणे, कोमट पाणी अथवा सूप पिणे, वाफ घेणे आणि वेळीच वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.

कान, नाक, घसा विकारतज्ज्ञ म्हणाले, की थंड हवा, विषाणूंचा वाढता प्रसार आणि हिवाळ्यात कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती यामुळे घशाचा संसर्ग उद्भवतो. प्रदूषण आणि धुक्यामुळे श्वसनमार्गाला सूज येते. यामुळे लक्षणे अधिक तीव्र होतात.

लक्षणांमध्ये घसा दुखणे, खवखवणे, कोरडेपणा आणि जळजळ, खोकला, कफ, आवाजात बदल आणि सौम्य ताप किंवा अंगदुखी यांचा समावेश आहे. घशाच्या संसर्गाच्या रुग्णांमध्ये ७० टक्क्यांनी वाढ झाली.

गेल्या महिन्यात २० ते ६० वयोगटातील १० पैकी सात लोक घसादुखी, सूज आणि घसा खवखवणे यासारख्या तक्रारी घेऊन रुग्णालयात दाखल होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# एनडी स्टुडिओ नवीन वर्षात उभारणार

## सांस्कृतिक कार्य विभाग सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील सिने सृष्टीतील ठिकाण चौक कर्जत मार्गावर असणारे एनडी स्टुडिओचे मालक नितीन देसाई यांच्या निधनानंतर एनडी स्टुडिओमधील सर्व शूटिंग कार्यक्रम ठप्प झाले. याठिकाणी मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून देसाई यांच्या निधनानंतर शासनाने सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत एनडी स्टुडिओ ताब्यात घेऊन पुन्हा उभारणीला सुरुवात केली आहे. त्यामुळे २०२६ मध्ये पुन्हा स्टुडिओ उभा राहील असा विश्वास व्यक्त होत असून याठिकाणी २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. येथील परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.



याप्रसंगी कलेच्या क्षेत्रामध्ये उत्तुंग अशी कर्तबगारी केली आहे. कलेच्या क्षेत्रात एका मराठी माणसाने साम्राज्य उभं केले, त्यांनी पाहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेऊन एनडी स्टुडिओच्या जतन आणि संवर्धनाची जबाबदारी नम्रपणे स्वीकारली आहे. या स्टुडिओला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांनी केले.

दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक तथा एनडीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल जोगळेकर, वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू - रावराणे, उपअभियंता (स्थापत्य) विजय बापट, एनडीचे प्रशासकीय अधिकारी सचिन निंबाळकर, श्रीकांत देसाई उपस्थित होते. तसेच यावेळी २५ ते ३१ डिसेंबर रोजी एन.डी.स्टूडियो येथे होणाऱ्या कार्निव्हलच्या पोस्टरचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील म्हणाल्या की, नितीन देसाई हे आधुनिक विश्वकर्मा होते. त्यांनी केलेल्या कार्याची आपल्याला सदैव आठवण राहील. एनडी स्टुडिओचे परिचलन आता गोरेगाव चित्रनगरीच्या माध्यमातून केले जात असून या स्टुडिओचे संकेत स्थळ आणि बुकिंग ॲप सुरू केले आहे.

आगामी काळात विविध सोई-सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. यावेळी प्रास्ताविक करताना मीनल जोगळेकर म्हणाल्या की, भव्यता काय असते हे नितीन देसाई या मराठी माणसाने दाखवून दिले. त्यांचे शासनाशी ऋणानुबंध होते, असे सांगत नितीन देसाई यांच्या आठवणी त्यांनी जागवल्या.

# स्कूल व्हॅन,रिक्षाला डंपरची धडक

**नवीन पनवेल :** नवीन पनवेल सिग्नल जवळ सिग्नल वर उभ्या असलेल्या स्कूल व्हॅन आणि रिक्षाला पाठीमागून आलेला डंपरने ठोकर मारून अपघात केला. या अपघातात स्कूल व्हॅन आणि रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात रिक्षाचालक, पॅसेंजर तसेच स्कूल व्हॅनमधील दोन मुले जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.नवीन पनवेल सिग्नल जवळ स्कूल व्हॅन आणि रिक्षा या वाहनांना पाठीमागून आलेला डंपरने धडक दिली. अपघातात स्कूल व्हॅनचे दरवाजे लॉक झाल्याने मुले स्कूल व्हॅनमध्ये अडकून पडली. घटनास्थळी आणि आजूबाजूला असणारे पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी, अंमलदार यांनी व्हॅनची काचेची खिडकी फोडून व बाजूचे पाईप ओढून बारा मुलांना व्हॅनमधून सुखरूपपणे बाहेर काढले.

# जिल्ह्यात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

१८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती विविध माध्यमांतून अल्पसंख्याकांना दिली जाते.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध ठिकाणी अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांचे संरक्षण, समानता व सन्मान याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्यांक हक्क दिन जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये अल्पसंख्यांक हक्कांबाबत जाहीर केलेल्या घोषणेनुसार दरवर्षी १८ डिसेंबर रोजी हा दिवस पाळला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व संबंधित विभागांच्या वतीने अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी भारताच्या संविधानातील कलम २९ व ३० नुसार अल्पसंख्यांकांना भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा तसेच शैक्षणिक संस्था स्थापन व व्यवस्थापनाचा अधिकार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच धर्मस्वातंत्र्य, समान संधी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा हक्क याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

अल्पसंख्यांक म्हणजे कोण, भारतीय संविधानाने अल्पसंख्यांकांना कोण कोणते हक्क, अधिकार दिले आहेत, त्यांचे कर्तव्य काय आहेत, शासन अल्पसंख्यांकांसाठी कोणकोणत्या योजना राबविते, विद्यार्थी, वस्ती, कच्चे कैदी, पोलीस भरती, स्पर्धा परीक्षा, संस्था अनुदान, वैयक्तिक अनुदान, शिष्यवृत्ती, सामाजिक एकता अशा विविध क्षेत्राकरिता अल्पसंख्यांकांसाठी शासन कोणकोणत्या योजना व उपक्रम राबविते याविषयीची विस्तृत माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान समाजात सलोखा, बंधुता व सामाजिक एकात्मता वाढवण्याचे आवाहन करण्यात आले.

विविधतेत एकता ही भारताची ओळख असून, अल्पसंख्यांक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अल्पसंख्यांक हक्क दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये हक्कांबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले.

पान १ वरून

## 'अनधिकृत'चे ३९ कोटी थकले

खरेदी विक्रीचा व्यवहार झाल्यावर त्याची नोंदणी शासकीय कार्यालयात केली जाते. मात्र बिनशेती करण्यासाठी लागणारा खर्च वाचविण्यासाठी काही मंडळी नोटरी अथवा प्रतिज्ञापत्र करून स्थानिक स्तरावर हे प्रकरण मार्गी लावतात. रायगड जिल्हयामध्ये १० हजार ६५३ ठिकाणी अकृषक वापरासाठी बांधकाम केल्याची माहिती समोर आली आहे. शासनाची कोणतीही परवानगी न घेता बांधकाम करण्यात आले आहे. त्यामध्ये माणगावमध्ये दोन हजार ६५९ व अलिबाग तालुक्यात एक हजार ३२२, त्याखालोखाल कर्जतमध्ये एक हजार ७१, पनवेलमध्ये ८८६, म्हसळामध्ये ५७१, पेणमध्ये ६६५, खालापूरमध्ये ५८९, ठिकाणी अधिक बांधकाम झाल्याची आकडेवारी समोर आली आहे.

जमिनीचा अकृषक वापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बिनशेती शोध मोहीम नावाचे विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांची माहिती घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई केली जाते. रायगड जिल्ह्यातील दहा हजार ६५३ जणांविरोधात या विभागामार्फत कारवाई करण्यात आली. त्यांना ४७ कोटी ४७ लाख ५४ हजार ७०३ रुपयांचा दंड आकारण्यात आला. त्यांना दंडाची नोटीस तलाठ्यांद्वारे पाठविण्यात आली. त्यानंतर त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात आला.

बिनशेती शोध मोहिमेअंर्गत अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर झालेल्या कारवाईतून सात कोटी रुपयांचा दंड वसूली करण्यास यश आले आहे. त्यामध्ये पनवेल तालुक्यातून ८५ लाख ४७ हजार रुपये, अलिबागमधून दोन कोटी १२ लाख, माणगावमधून २० लाख,३४ हजार रुपये, खालापूरमधून २१ लाख रुपये, उरणमधून दोन कोटी ४५ लाख रुपये, कर्जतमधून ३८ लाख, १२ हजार रुपये, पेणमधून ३६ लाख, ९१ हजार रुपये, महाडमधून १२ लाख दोन हजार ५७० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. मात्र शंभर टक्के दंड वसूली करण्यास प्रशासन उदासीन ठरल्याचे चित्र आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.३९ कोटी रुपयांचा दंड वसूल करणे शिल्लक राहिले आहे. ही वसूली कुर्म गतीने सुरु असल्याने प्रशासनाच्या महसूलावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## दुसऱ्या दिवशी १९४ उमेदवारी अर्जांची विक्री

नामनिर्देशन पत्र विक्रीच्या दुसऱ्या दिवशी एकुण १९४ नामनिर्देशन पत्रांची विक्री झाली आहे.

नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी २३ डिसेंबर ते ३० डिसेंबरदरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. दरम्यान आज बुधवार दिनांक २४ डिसेंबर दुसऱ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय १, प्रभाग १,२आणि ३ रोजी एकूण ५५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०२ , प्रभाग ४,५,६ येथे एकूण २३ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०३ , प्रभाग ७,८,९,१० येथे एकूण ३७ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी कार्यालय ०४ कामोठे , प्रभाग ११,१२,१३ येथे एकूण ४५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०५, प्रभाग १४,१५,१६ येथे एकूण १८ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०६, प्रभाग १७,१८,१९,२० येथे एकूण १६ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. एकूणच आज सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून १९४ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. तर नामनिर्देशन पत्र प्राप्त संख्या शून्य आहे.

नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर तत्काळ प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार, २ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार, ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याचदिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.

## विमानसेवेला भूमिपुत्रांनी निषेध नोंदवावा

दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे, यासाठी खा. सुरेश (बाळ्या) म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांनी २२ डिसेंबर रोजी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता. या मोर्चा विषयी तसेच भूमिपुत्रांच्या अनेक प्रश्नांसाठी सुरेश (बाळ्या) म्हात्रे यांनी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. या भेटीत मनोज जरांगे पाटील यांनी भूमिपुत्रांच्या मोर्चाला ठाम पाठिंबा जाहीर केला. परंतू, निवडणूक आचारसंहितेमुळे हा मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.

उद्यापासून व्यावसायिक विमानसेवा नियमित सुरू होत आहे. परंतु, अजूनही विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात आलेले नाही. जोपर्यंत दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला दिले जात नाही, तोपर्यंत हा संघर्ष कुठल्याही परिस्थितीत थांबणार नाही, अशी ठाम भूमिका खा. सुरेश म्हात्रे यांनी घेतली आहे. त्यांनी भूमिपुत्रांना आवाहन केले आहे की, २५ डिसेंबर रोजी आपापल्या गावात एकत्रित येत गावाच्या प्रवेशद्वार, गावदेवीचे मंदिर, चावडी किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी शांततेच्या मार्गाने काळा झेंडा दाखवत सुरु होणाऱ्या विमानसेवेला निषेध नोंदवावा. हा निषेध घराघरात कुटूंबासह केला तरी चालेल. या निषेधाचे व्हिडीओ तयार करुन व्हॉटसॲप, फेसबुक आणि इन्स्टाग्राम वर शेअर करावेत. जेणेकरुन प्रत्येक गावातून उठलेला आवाज सरकारपर्यंत पोहोचेल. समाजमाध्यमावरचा हा एकत्रित निषेध शासनाला उत्तर देण्यास भाग पाडेल.

नवी मुंबई विमानतळालगत असलेल्या चिंचपाडा गावातील ग्रामस्थ २५ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष निदर्शने करणार आहेत. ज्यांना शक्य असेल त्यांनी त्या ठिकाणी पोहोचून आंदोलनात सहभाग घ्यावा आणि आपला ठाम निषेध नोंदवावा, असे आवाहन खासदार सुरेश म्हात्रे यांनी केले आहे. २५ डिसेंबरचा निषेध हा केवळ एक टप्पा आहे. हे आंदोलन संपलेले नाही, तर तात्पुरते स्थगित आहे. आचारसंहिता संपताच नव्या जोमाने, नव्या ऊर्जेसह आणि अधिक व्यापक स्वरूपात हा संघर्ष पुन्हा उभा राहील, असेही ते म्हणाले.

## ठाकरे बंधूंची युतीची घोषणा

आपण भांडत राहिलो तर जो संघर्ष झाला, हुतात्मा स्मारक आहे त्याचा अपमान आहे.एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी. यापुढे मुंबई आणि महाराष्ट्रावरती कपटी कारस्थानाने मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न करेल त्याचा खात्मा केल्याशिवाय राहणार नाही ही शपथ घेऊन मैदानात उतरलोय.

विधानसभेवेळी भाजपने अपप्रचार केला की बटेंगे तो कटेंगे....तसं आता फुटाल तर संपून जाल, तुटू नका फूटू नका, मराठीचा वसा टाकू नका. असा संदेश युतीच्या वतीने देतो आहे. मराठी माणूस कुणाच्या वाटेला जात नाही. पण त्याच्या वाटेला येणाऱ्याला परत जाऊ देत नाही अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी इशारा दिला.

मुंबईसह जवळपास १० मापालिकासाठी ही युती असल्याचं म्हटलं जात आहे. फक्त मुंबईपुरतीच नाही तर राज्यातल्या इतर काही महापालिकांमध्ये युती असेल अशा चर्चा होत्या. मुंबईत युतीआधीच जागावाटप ठरल्याचं सांगण्यात येतंय. शिवसेना ठाकरे गट १४५ ते १५० तर मनसे ६५ ते ७० जागा लढवण्याची शक्यता आहे.

## दहावी-बारावी परीक्षेवर करडी नजर

सरमिसळप्रमाणेच या वर्षीपासून पर्यवेक्षकांचीही सरमिसळ केली जाणार आहे.

शहरातील पर्यवेक्षक दुसऱ्या शाळांमध्ये तर ग्रामीणमधील पर्यवेक्षक तालुक्यातील दुसऱ्या केंद्रांवर नेमले जाणार आहेत. ओळखीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत सैल सोडण्याचे प्रकार होऊन नयेत म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षकांच्या मोबाईलचे कॅमेरे सुरु ठेवून तेथील हालचालींवर जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी लक्ष ठेवणार आहेत.

**बारावीची प्रात्यक्षिक २३ जानेवारीपासून**

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक तथा तोंडी चाचणी २३ जानेवारीपासून सुरु होईल.तर दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होईल. त्यांचे प्रात्यक्षिक २ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यात व्यस्त आहेत.

## नवी मुंबईतून आज प्रवासी विमान झेपावणार

नोंदला जाणारा ठरणार आहे.

देशातील अत्याधुनिक हरितपट्टा (ग्रीनफिल्ड) विमानतळ म्हणून विकसित झालेल्या या प्रकल्पाच्या यशस्वी उभारणीमागे सिडकोची दूरदृष्टी, काटेकोर नियोजन आणि सक्षम अंमलबजावणी ठळकपणे दिसून येते. पहिल्याच दिवशी एकूण ३० एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्ससह विमानतळाचे संचालन सुरू होणार असून, ही सिडकोसाठी ऐतिहासिक झेप मानली जात आहे.

विमानतळ नियोजनापासून प्रत्यक्ष उड्डाणापर्यंतचा हा सारा प्रवास अनेक दशकांचा आहे. या काळात विविध शासकीय यंत्रणा, तांत्रिक तज्ज्ञ आणि अंमलबजावणी संस्थांमधील समन्वयाचे उत्तम उदाहरण या प्रकल्पातून समोर आले आहे. विमानतळ सुरू झाल्याने मुंबई महानगर प्रदेशातील हवाई वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, मल्टी-एअरपोर्ट प्रणाली अधिक सक्षम होणार आहे.

कमळाकृती संकल्पनेवर आधारित भव्य टर्मिनल रचनेसाठी अदानी समूह आणि एनएमआयएएल यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडविणारी ही वास्तुरचना शाश्वत विकास, नवोन्मेष आणि जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरत आहे.

विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर नवी मुंबई, पनवेल, उरण, कर्जत, पेण या परिसराचे महत्व व्यावसायिक दृष्ट्या वाढेल. तसेच या परिसरासह ठाणे, पुणे, रायगड या जिल्ह्यांसह कोकणातील नागरिकांना देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक सुलभ होणार आहे. महामार्ग, द्रुतगती मार्ग, रेल्वे, मेट्रो आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंकसारख्या प्रकल्पांमुळे विमानतळाची मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी अधिक बळकट होणार आहे. रोजगारनिर्मिती, पर्यटनवृद्धी आणि औद्योगिक गुंतवणुकीसाठीही हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

दोन दिवसांनंतर पहाटेपासून नवी मुंबई आणि पनवेलच्या डोक्यावरून विमानांचे नियमित उड्डाण सुरू होईल. हा क्षण पनवेल परिसराला विकासाच्या शिखरावर नेणारा, यशाची नवी ओळख निर्माण करणारा ठरणार आहे.

## प्रेमसंबंधातून तरुणाचा खून

जावेद पठाण हा फिर्यादी रौफ शेख याचा नातेवाईक आहे. जावेद आंबेगाव येथील वॉशिंग सेटरवर काम करत होता. आरोपी संदीप भुरकेच्या नात्यातील एका तरुणीसोबत त्याचे चार-पाच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. हे सर्वजण एकाच गावचे राहणारे आहेत. संदीपला त्याच्या नात्यातील तरुणीचे जावेदसोबत असलेले प्रेमसंबंध मान्य नव्हते.

अशातच जावेद त्या तरुणीला गावाकडून आपल्यासोबत पुण्यात घेऊन आला होता. त्यामुळे संदीप त्याच्यावर चिडला होता. संदीपला जावेद आंबेगाव परिसरात कोठे काम करतो, याची माहिती मिळाली होती. त्याने आपल्या एका साथीदाराला सोबत घेऊन त्याच्यावर धारधार शस्त्राने वार केले. जावेदच्या डोक्यात आणि पाठीवर वार केल्याने तो गंभीर जखमी झाला होता. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी घटनास्थळी धाव घेतली. जावेदला सुरूवातीला उपचारासाठी आंबेगाव येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

परंतु, त्याची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा उपचार सुरू असताना मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनास्थळी पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी भेट दिली. आरोपी संदीप भुरके आणि त्याचा साथीदार फरार आहेत. आंबेगाव पोलीस आणि गुन्हे शाखेची पाच पथके दोघांच्या मागावर रवाना झाली आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक गुन्हे गजानन चोरमले करत आहेत.

# अंत्योदय कार्डधारकांना मिळणार साखर

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

अंत्योदय कार्डधारकांना दीड वर्षांनंतर रेशन दुकानातून प्रतिमाह एक किलो साखरेचे वितरण केले जाणार आहे. त्यानुसार पुरवठा विभागाच्या गोदामामध्ये साखर उपलब्धही झाली आहे. २० रुपये किलोने साखरेचा पुरवठा केला जाणार आहे. एका अंत्योदय कार्डला रेशन दुकानातून प्रतिमहा एक किलो साखरेचे वितरण केले जाणार आहे.

मागील दीड वर्षांपासून साखरेच्या टेंडर प्रक्रियेअभावी रेशन दुकानांमधून साखर वितरण पूर्णपणे बंद होते. अंत्योदय कार्डधारकांना तब्बल दीड वर्षानंतर रेशनवर साखर मिळणार असून आगामी काही दिवसांतच रेशन दुकानातून साखरेचे वाटप सुरू होणार आहे. यामुळे यंदा नागरिकांना नववर्षाआधीच गोडवा मिळाला आहे.

पनवेल पुरवठा विभागातील ६८०० पेक्षा अधिक अंत्योदय कार्डधारकांना साखर २० रुपये दराने मिळणार आहे. सध्या बाजारात साखरेचा दर ४५ ते ४८ रुपये किलो आहे. पनवेलच्या गोदामांमध्ये साखर उपलब्ध झाली असून लवकरच वितरित करण्यात येणार असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. सध्या बाजारात साखरेचे भाव बाजारात वाढलेले आहेत. ४५ ते ४८ रुपये प्रती किलो दराने साखर बाजारात उपलब्ध आहे. पनवेलमधील ६ हजार ८०० पेक्षा अधिक अंत्योदय कार्डधारकांना वीस रुपये दराने एक किलो साखर रेशन दुकानावर मिळणार आहे.

## निवडक



### बंधाऱ्यालगतची जमीन गेली धुवून

**महाड :** तालुक्यातीळ तेटघर येथील बांधलेला सिमेंट काँक्रीटचा बंधारा पहिल्याच पावसात वाहून गेला आहे. त्यामुळे बंधाऱ्यालगतची शेतजमीन धुपून गेल्याची गंभीर घटना समोर आली आहे. संबंधित बंधाऱ्याच्या कामात ठेकेदाराने केलेल्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. पाणी अडवण्यासाठी व शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेला बंधारा पहिल्याच पावसात अपयशी ठरल्याने प्रशासनाच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, बंधाऱ्याच्या बाजूने आवश्यक ती संरक्षक भिंत, दगडी पॅकिंग व माती धूप रोखण्यासाठीची उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. काम पूर्ण झाल्यानंतरही योग्य तपासणी न करता घाईघाईत बिले काढण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. पावसाचे पाणी वेगाने वाहू लागल्याने बंधाऱ्यालगतची माती सरकली आणि काही क्षणातच शेतातील सुपीक जमीन वाहून गेली. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे पिकांचे नुकसान झाले असून पुढील हंगामातील शेतीही धोक्यात आली आहे. आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यावर आता नव्या संकटाचे सावट आले आहे.




### टेक केअर ग्लोबल कंपनीमुळे दुर्गंधी

**रसायनी :** रसायनी-कोन रस्त्यावरील टेक केअर ग्लोबल सर्विसेस या कंपनीतून पसरणाऱ्या तीव्र दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे हा प्रकल्प रहिवासी क्षेत्रापासून स्तथांतरीत करावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे. या ठिकाणी रसायने व इतर उत्पादनांच्या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या टँकची तपासणी, व्यावसायिक देखभाल, दुरुस्ती आणि चाचणी एका विशिष्ट प्रकारे तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली केली जात असल्याचे समोर येत आहे. दररोज हजारो टँकची तपासणी केली जात असून त्या प्रक्रिये दरम्यान वापरल्या जाणाऱ्या विविध रासायनिक पद्धतीमुळे परिसरात अस्वस्थ करणारी तीव्र दुर्गंधी मोठ्या प्रमाणात पसरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### औद्योगिक नगरीला ‘अनधिकृत’ विळखा

**चिरनेर :** चाणजे महसुल विभागाच्या हद्दीत सरकारी जागेतच शेकडो अनधिकृत बांधकामे झाली आहेत. सरकारी जागेत होत असलेल्या अनधिकृत बांधकामांना महसुल, सिडको, वन व बंदर विभागाच्याच काही अधिकाऱ्यांचा वरदहस्त आहे. त्यामुळेच अनधिकृत बांधकामे फोफावत चालली असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दरम्यान, उरण परिसर औद्योगिकदृष्ट्या प्रचंड प्रगतीपथावर आहे. या ठिकाणी विकासकामे आणि विविध कंपन्यांच्या उभारणीसाठी तसेच दगडमातीच्या भरावासाठी उत्खनन करण्यात आलेल्या शासकीय भूखंडावरील जागांचे सपाटीकरण झाले आहे. या सपाटीकरण झालेल्या विविध शासकीय विभागाच्या जागेवरच मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी शेकडो अनधिकृत बांधकामे तयार होऊन अनधिकृतपणे भल्यामोठ्या वसाहतीच निर्माण झाल्या आहेत. मात्र, याबाबत शासकीय यंत्रणेला त्याचे काही एक सोयरसुतक नसल्याचे चित्र आहे. त्यातच चाणजे येथील आधुनिक करंजा मच्छीमार बंदर कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे करंजा गाव मिनी औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जात आहे. तसेच, करंजा लॉजिस्टिक बंदर, करंजा-रेवस सागरी सेतू, करंजा-रेवस रो-रो सेवा यामुळे चाणजे परिसरातील जागा-जमिनीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे येथील जमिनींवरही अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहेत. याआधीच करंजा-रेवस पुलाच्या नियोजित आरक्षित जोडरस्त्याच्या जागेत सुमारे १५० पेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे झाल्याचे उघडकीस आले आहे.

### दारू माफियांवर शासकीय वरदहस्त?

**उरण :** नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी अवघे काहीच दिवस शिल्लक असताना जल्लोषाची तयारी सुरू झाली आहे. मात्र, या आनंदाच्या काळातच बनावट दारूचा काळाबाजार फोफावण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली असून, जनतेच्या जीवाशी सरळसरळ खेळ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या दारू माफियांवर शासकीय यंत्रणेचा वरदहस्त आहे का, असा संतप्त प्रश्न उरणकरांकडून उपस्थित होत आहे. नाताळ व थर्टी फस्ट या काळात दारूची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे हाच काळ साधून काही दारू विक्रेते नामांकित ब्रँडच्या नावाखाली भेसळयुक्त व बनावट दारूची विक्री करीत असल्याचे चित्र उरण तालुक्यात वारंवार दिसून येत आहे. येथील अनेक बारमध्ये खुलेआम बनावट दारू पाजली जात असल्याच्या तक्रारी असूनही, संबंधित यंत्रणा डोळेझाक करत असल्याचा आरोप उरणकरांकडून होत आहे. त्याचबरोबर तालुक्यात शासकीय जागांवर बेकायदेशीरपणे उभारलेल्या ढाबे, हॉटेल्स व फार्महाऊसवर विनापरवाना दारू विक्री सुरू आहे. याबाबत अनेकदा तक्रारी, निवेदने आणि वृत्त प्रसिद्ध होऊनही ठोस कारवाई होत नसल्याने संशय अधिकच बळावत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही दारू विक्रेत्यांकडून दर महिन्याला हप्ता दिला जातो, म्हणून त्यांच्यावर कारवाई होत नाही, अशी दरपोक्ती करत असल्याचे बोलले जात आहे. यामुळे बनावट दारू विक्रेत्यांना शासकीय यंत्रणेचा वरदहस्त आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# उरण बायपासचे काम पूर्णत्वाकडे

- नगरपरिषदेच्या अखत्यारीतील रस्ता रखडला
- वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

## 31 जानेवारी रोजी कार्यान्वित होण्याची शक्यता



### निधी उभारण्यासाठी आमदारांची उदासिनता

उरण बायपास मार्गावरील नगरपरिषदेच्या अखत्यारीतील रस्त्यावरील १५ मुळ भोगवटादार आणि इतरांच्या मालकीच्या ४२०० चौरस मीटर जमिनी संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, नगरपरिषदेकडे भोगवटादारांना मोबदला देण्यासाठी १२ कोटींचा आवश्यक निधी उपलब्ध नाही. त्यामुळे या निधीसाठी नगरपरिषदेने शासनाला गाऱ्हाणे घातले आहे. दरम्यान, उरणच्या विकास कामांसाठी ६ हजार कोटींचा निधी आणण्याचा दावा करणारे आमदार महेश बालदी यांनाही १२ कोटींच्या निधीची तरतूद करणे अद्यापही शक्य झाले नसल्यामुळे त्यांची देखील उघड उदासिनता दिसून येत आहे. त्यामुळे, उरण बायपास रस्त्याच्या कामाचे घोंगडे भिजत पडले आहे.

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सिडकोकडून करण्यात येणारा ५०.६८ कोटी खर्चाचा उरण बायपास रस्ता व त्यावरील पुलाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे हे काम ३१ जानेवारी रोजी पुर्णत्वास जाणार असून उरण शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघण्यात मोठी मदत होणार आहे. अशी माहिती सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रियांका रातांबे यांनी दिली. मात्र, उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीतील रस्त्याच्या कामातील अडचणींमुळे येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली लागणार का, असा प्रश्न सध्या उरणकरांमधून उपस्थित होत आहे.

उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी सातत्याने केलेला संघर्ष व वाहतूक कोंडीच्या समस्यांच्या पाठपुराव्यानंतरच सिडकोकडून उरण बायपास रस्त्याचे नियोजन करण्यात आले आहे. सिडकोने द्रोणागिरी नोडमधील आनंदी हॉटेल ते उरण शहरातील कोर्ट पर्यंतचा १,३४१ मीटर लांबीचा आणि ११ मीटर रुंदीचा बायपास रस्ता तयार करण्याचे काम सुरू आहे. या १,३४१ मीटर लांबीच्या रस्त्यापैकी ४०० मीटर लांबीचा रस्ता उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीत येत आहे. उर्वरित ९४१ मीटर लांबीचा बायपास रस्ता सिडको मार्फत बांधण्यात येत आहे. त्यामध्ये ६.४०.४२५ मीटर लांबीचा पुल व १५३.००४ लांबीच्या सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्यासह १४८.०७१ लांबीच्या रिटेनिंग वॉलचा समावेश आहे. मागील सात-आठ वर्षांपासून सुरू असलेल्या ५०.२६ खर्चाचे काम आता ८५ टक्के पुर्ण झाले आहे.

> संपादीत करण्यात येणाऱ्या १५ भोगवटादारांना जमिनीचा मोबदला देण्यासाठी १२ कोटी निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. निधीसाठी पाठपुरावा सुरू आहे. उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी करण्यासाठी उरण बायपास रस्त्याचे काम तातडीने होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.
>
> – निखिल ढोरे, सहाय्यक रचनाकार, उरण नगररचना विभाग

त्यामुळे सिडकोच्या अखत्यारीत असलेले उरण बायपास रस्त्याचे काम ३१ जानेवारी अखेरीस पुर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे हा बायपास रस्ता व पुल कार्यान्वित झाल्यानंतर उरण शहरातील जनतेचा वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघेल, असा विश्वास सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रियांका रातांबे यांनी व्यक्त केला आहे.

याआधीच विलंबामुळे ८ कोटी खर्चाचे काम आता ५९.२६ कोटी रुपयांपर्यंत पोहचले आहे. तसेच, सिडकोच्या अखत्यारीतील ९४१ मीटर लांबीचा बायपास रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतरही उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीतील फक्त ४०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम रखडलेले आहे. हा रस्ता जोपर्यंत पुर्ण होत नाही तोपर्यंत या बायपास रस्त्यावरुन वाहतूक शक्य होणार नाही. कारण नगरिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या रस्त्यामुळे खासगी घरे व जमिनीही बाधीत होणार आहेत. ही समस्या सुटेपर्यंत उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत जाणार असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

## पर्यटकांच्या सुरक्षेसाठी खबरदारीचे आवाहन



| चिरनेर | प्रतिनिधी |

एलिफंटा बेटावर ख्रिसमस, सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी व येथील लेणी पाहण्यासाठी हजारो देशी-विदेशी पर्यटक येत असतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेतेसाठी सर्वच शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवाडी यांनी केले आहे. पर्यटकांची सुरक्षिततेसाठी खबरदारीची उपाययोजना करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि.२३) एलिफंटा बेटावर शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलाविण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीसाठी सरपंच मीना भोईर, उप सरपंच बळीराम ठाकूर, महाराष्ट्र सागरी मंडळ एलिफंटा जेट्टीचे बंदर निरीक्षक विनायक करंजे, गेटवे जलवाहतूक संस्थेचे नासिर मारणे, एलिफंटा लोकल गाईडचे प्रतिनिधी, दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचे प्रतिनिधी, एलिफंटा लेणी येथील कार्यालयाचे सिक्युरिटी, स्थानिक नागरिक तथा कर्मचारी आदी उपस्थित होते.

## ५२ विकासकांना पालिकेची नोटीस

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल पालिका क्षेत्रात सध्या विविध ठिकाणी नवीन इमारती बांधण्याचे काम सुरू आहे. या बांधकामांमुळे हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे हवा प्रदूषण पातळी कमी करण्याबाबत १५ प्रकारच्या मार्गदर्शक सुरक्षा उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी न करणाऱ्या आणि बांधकामाच्या ठिकाणी सेन्सॉर आधारित वायु प्रदूषण मॉनिटर स्थापित न लावणाऱ्या पनवेलमधील एकूण ५२ विकासकांना काम बंदची नोटिस बजावण्यात आली आहे. त्यात कळंबोलीतील ९, कामोठ्यातील १०, नवीन पनवेलमधील २८ आणि पनवेलमधील ५ प्रभाग निहाय नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. अशी माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील शिरीषकर यांनी दिली.

## सर्व्हिस रोडवर गतिरोधकाची उभारणी



| नागोठणे | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला नागोठण्यात वेग आला आहे. सध्या येथील तिन्ही उड्डाण पुलांचे कामही जोमाने सुरू आहेत. या उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडवर आवश्यक तेथे गतिरोधक उभारण्याची गरज आहे. यापैकीच नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी समोरील उड्डाणपुलाच्या बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडवर मंगळवारी (दि.२३) सायंकाळी गतिरोधक उभारण्यात आला. अशाचप्रकारे येथील खडक आळी भागातून महामार्गाच्या सर्व्हिस रोडवर येताना वाहनचालकांना भरधाव वाहनांमुळे अपघाताचा धोका असल्याने येथील स्टेट बँकेच्या पुढील भागात असलेल्या सर्व्हिस रोडवरही तत्काळ गतिरोधक उभारावा, अशी मागणी वाहनचालक व खडक आळीतील नागरिकांतून होत आहे.

## कडाक्यात विद्यार्थ्यांना मायेची उब

| वावोशी | प्रतिनिधी |

यंदा राज्यात थंडीचा पारा मोठ्या प्रमाणात घसरल्याने लहान मुलांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम जाणवत आहे. थंडीमुळे आजारपण वाढू नये, विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती नियमित राहावी आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक जाणिवेतून वावोशी परिसरातील शाळांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांसाठी मायेची उब देणारा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत श्री छत्रपती विद्यालय वावोशी, राजिप शाळा गोरठण बु. व दांडवाडी येथील गरजू विद्यार्थ्यांना हुडीज व जॅकेट्सचे मोफत वितरण करण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरला आहे.

## घसरलेल्या वीज निर्मितीत वाढ

| चिरनेर | प्रतिनिधी |

मागील तीन महिन्यांपासून उरणच्या ६७२ मेगावॅट वायु वीज केंद्रातुन दररोज ४५० मेगावॅट वीज निर्मिती केली जात आहे. यापुढे जर गेल व ओएनजीसीकडून २.९ ते ३.३ एमएमएससीएमडी गॅसचा पुरवठा झाल्यास या केंद्रातुन सुमारे ६०० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाऊ शकते. त्यामुळे राज्याच्या वीज तुटवडा कमी करण्यासाठी केंद्रातील अधिक मेगावॅट वीजनिर्मितीची मोलाची भर पडण्यास मदत होईल, अशी माहिती उरण वायु विद्युत केंद्राच्या सीजीएम विजया बोरकर यांनी दिली.

उरण-बोकडवीरा येथे विदेशी जर्मनीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वायुवर चालणारा ६७२ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेचा वायू विद्युत केंद्र प्रकल्प उभारण्यात आला आहे. या वीज निर्मिती प्रकल्पात चार गॅस टर्बाईन व दोन स्ट्रीम टर्बाईन असे एकूण सहा संच आहेत. याआधी या प्रकल्पाला गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून आवश्यकतेनुसार तीन एमएमएससीएमडीहून अधिक गॅसचा पुरवठा होत होता. त्यामुळे ६७२ मेगावॅट वीजनिर्मितीच्या या सहा संचातुन याआधी ६००हून अधिक मेगावॅट विजेची निर्मिती केली जात होती. मात्र, त्यानंतर काही तांत्रिक अडचणी आणि आवश्यक त्या देखभाली अभावी मागील काही वर्षांपासून वायु विद्युत केंद्रातील सहा पैकी तीन संच बंद पडले. त्यामुळे या वायु विद्युत केंद्राची वीजनिर्मितीची क्षमता ६७२ मेगावॅटवरून २२५-३०० मेगावॅटपर्यंत अगदी निम्यावर येऊन ठेपली होती. मात्र, मागील काही महिन्यांपासून प्रकल्पाला कंपन्यांकडून १.७ वरुन २.४ एमएमएससीएमडी इतका गॅस पुरवठा केला जात आहे. यामुळे वीज निर्मितीचा एक संच बंद असतानाही उर्वरित पाच वीज निर्मितीच्या संचातुन दररोज ४५० मेगावॅट वीजनिर्मिती केली जात आहे.

## नागांव शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात





| अलिबाग | शहर प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील नागांव संचालक मंडळाच्या प्राथमिक व हायस्कुल शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दि.२२ व २३ डिसेंबर रोजी आयोजीत करण्यात आलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कला गुणांचे सादरीकरण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

सोमवारी (दि.२२) नागांव संचालक मंडळाचे अध्यक्ष एम.एन. पाटील यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका भावेश्री वाळंज, हायस्कुल शाळेचे मुख्याध्यापक अजित पाटील, शिक्षक नवनाथ जाधव, विशाल शेजुळ, मानसी ठाकूर, प्रणाली भगत, ओवी पोईलकर, नृत्तया राऊळ, तेजश्री तारकर, मिताली प्रधान, संजना प्रधान, सेविका लिना देशमुख, शालिनी राणे व हर्षला राऊळ यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व दोन्ही शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन मुख्याध्यापिका भावेश्री वाळंज यांनी केले. या दोन दिवसीय कार्यक्रमात दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपले सुप्त कलागुण सादर केले. यावेळी लावणीसह कोळीगीते आणि पारंपारिक नृत्याचा जल्लोष रसिकांना याची देही याची डोळा अनुभवायला मिळाला.

धूळप्रदूषण रोखण्यासाठी पाण्याचे फवारे | प्रशासनाचे पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य

# जेएनपीएची प्रदूषण नियंत्रणाकडे ठोस पावले



| उरण | प्रतिनिधी |

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) परिसरात वाढत्या वायू व धूळप्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने ठोस, पर्यावरणपूरक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. बंदर परिसरात सातत्याने सुरू असलेल्या मालवाहतूक, कंटेनर हाताळणी तसेच अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे निर्माण होणाऱ्या धूळप्रदूषणावर मात करण्यासाठी पाण्याच्या फवाऱ्यांची व्यापक अंमलबजावणी करण्यात येत आहे.

जेएनपीएच्या अंतर्गत रस्ते, कंटेनर यार्ड, गोदाम परिसर, मालवाहतुकीचे मार्ग तसेच संवेदनशील भागांमध्ये नियमित अंतराने पाण्याचे फवारे मारले जात आहेत. त्यामुळे हवेत उडणारी धूळ जमिनीवर बसून वायू प्रदूषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः उन्हाळ्यात व कोरड्या हवामानात धूळप्रदूषण अधिक तीव्र होत असल्याने हा उपक्रम अधिक प्रभावी ठरत आहे. तसेच, जेएनपीए प्रशासनाने पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देत केवळ पाण्याचे फवारेच नव्हे, तर हरित पट्टा वाढविणे, वृक्षलागवड, रस्त्यांची नियमित स्वच्छता, यांत्रिक स्वीपिंग मशिन्सचा वापर तसेच प्रदूषण नियंत्रण मानकांचे काटेकोर पालन करण्यावरही भर दिला आहे. बंदर परिसरातील विविध टर्मिनल ऑपरेटर आणि कंत्राटदारांनाही प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना राबविण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

या उपक्रमामुळे जेएनपीए परिसरात काम करणारे कर्मचारी, वाहनचालक तसेच आसपासच्या उरण तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. पूर्वी धूळप्रदूषणामुळे श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ तसेच आरोग्यविषयक तक्रारी वाढत होत्या. मात्र, पाण्याच्या फवाऱ्यांच्या नियमित वापरामुळे वातावरणातील प्रदूषणाचे प्रमाण कमी झाल्याचे नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पर्यावरण संतुलन राखत बंदर विकास साधण्याचा जेएनपीएचा संकल्प असून, भविष्यातही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रदूषण नियंत्रणासाठी आणखी प्रभावी उपाय राबविले जाणार असल्याचे जेएनपीए प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे विकासासोबत पर्यावरण संरक्षणाचा समतोल साधण्याचा आदर्श जेएनपीए परिसरात निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

## अधिकाऱ्यांच्या बदल्या

| नेरळ | प्रतिनिधी |

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सध्या सुरु असून आता महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. लवकरच जिल्हा परिषदा आणि तालुका पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका जाहिर होणार आहेत. निवडणुकांच्या कार्यक्रमाची गृह विभागाला अधिक कल्पना आहे. त्यामुळे गावपातळीवर होणारी निवडणुकीमध्ये राजकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी अनेक वर्षे एकाच पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिले आहेत. त्यात कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदीप भोसले आणि नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांचा समावेश आहे.

# टाळी, टाळ्या आणि नंतर..

इंग्रजीत टू लिटल, टू लेट म्हणजे अगदी थोडे, अगदी उशिरा असा शब्दप्रयोग आहे. शिवसेना व मनसे यांच्या युतीची घोषणा बुधवारी ज्या रीतीने झाली त्याबाबत कदाचित हा शब्दप्रयोग वापरता येईल. बऱ्याच दिवसांच्या उलटसुलट चर्चांनंतर या दोन्ही पक्षांनी एक पाऊल पुढे टाकले आणि उद्धव व राज यांनी एकमेकांना अखेर टाळी दिली. त्यासाठी माध्यमांमधून प्रचंड टाळ्या वाजल्या आहेत. पण मतपेटीत या टाळ्या वाजणार का हे १६ जानेवारीलाच कळणार आहे. एक मात्र नक्की की, या युतीमुळे मुंबई व महाराष्ट्राच्या राजकारणाच्या फेरमांडणीच्या नव्या शक्यता खुल्या झाल्या आहेत. ठाकरे बंधू एकत्र येणार, निघाले, आले, अखेर बोलले असा गजर गेली अनेक दिवस माध्यमांमधून चालू होता. बुधवारी उद्धव व राज यांची पत्रकार परिषद होणार असल्याने टीव्ही वाहिन्यांनी सगळ्यांची प्रचंड उत्सुकता वाढवून ठेवली होती. पण प्रत्यक्षात बुधवारी वरळीमध्ये पाच मिनिटांमध्ये युतीची घोषणा करून विषय संपवण्यात आला. तूर्तास मुंबई महापालिका निवडणुकांमध्येच युती असेल एवढेच सांगण्यात आले. हे बंधू वेगळे झाले त्यावेळी बरेच महाभारत झाले होते. त्यामुळे ते एकत्र येताना निदान थोडी तरी कारणे दिली जातील असे वाटत होते. पण मराठी माणसाच्या हितासाठीचे हे कर्तव्य आम्ही पार पाडत आहोत असे उद्धव म्हणाले. आमची भांडणे व वादांपेक्षा महाराष्ट्र मोठा आहे असे विधान राज यांनी महेश मांजरेकरांना दिलेल्या मुलाखतीत केले होते. त्याची त्यांनी आठवण करून दिली व त्या हेतूनेच आपण एकत्र येत असल्याचे राज म्हणाले. याचाच अर्थ एका विशिष्ट परिस्थितीत व तडजोड म्हणूनच हे मनोमीलन झालेले आहे हे जणू या दोन्ही बंधूंनी मान्य केले. त्यामुळेच, अधिक प्रश्नांची उत्तरे न देता पत्रकार परिषद गुंडाळण्यात आली. दोन्ही बंधू एकत्र येणे हा ऐतिहासिक क्षण आहे असे माध्यमे सांगत होती. संजय राऊत यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणला गेला त्या क्षणाशी याची तुलना केली. पण त्या ऐतिहासिकतेचा प्रत्यय दोन्ही बंधूंच्या देहबोलीतून आला नाही. कदाचित महापालिका निवडणुकांच्या प्रचाराच्या काळात ते यावर अधिक बोलतील. भाजप हा दोघांचा समान शत्रू राहील हे उघड आहे. पण भाजपवर कोण कोणत्या रीतीने व कोणत्या थराला जाऊन टीका करतो हेही पाहावे लागेल.

### मराठी मतदार काय करणार

मुंबई हा शिवसेनेचा प्राण आहे. संपूर्ण शिवसेना फोडली तरीही सेनेची मुंबईतील ताकद आपल्याला खच्ची करता येत नाही हे भाजपला चांगले ठाऊक आहे. भाजपला कोणतीही किंमत देऊन मुंबई जिंकायची आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी तसेच महाराष्ट्राचीही राजधानी आहे हे त्यामागचे कारण आहेच. पण हिंदुत्वाची विचारसरणी ठेवूनही भाजपला विरोध करणारा व करू शकणारा एकमेव पक्ष हा शिवसेनाच आहे. आज ठाकरे सेना खूप दुबळी आहे. पण ती पुनरुज्जीवीत होण्याच्या शक्यताही मुंबईतच आहेत हे भाजप जाणून आहे. तसे झाले तर ती वणव्यासारखी राज्यात पसरू शकते हा अनुभव भाजपने पूर्वी घेतला आहे. त्यामुळेच भाजप अत्यंत सावधगिरीने पावले टाकतो आहे. विधानसभेला विक्रमी यश मिळवूनही भाजपने शिंदे सेनेला आपल्यासोबत ठेवण्याचे एकमेव कारणही ठाकरे सेनेचा धोका हेच आहे. आता भाजप आणि शिंदे गट पैसा, सत्ता यांचा अमर्याद वापर करून मुंबई पालिका घेण्यासाठी प्रयत्न करणार अगदी स्पष्ट आहे. नगरपालिका निवडणुकीत काही ठिकाणी एकेका मताला ५ हजार रुपये मोजले गेले असे सांगतात. मुंबईत तर विविध आमिषांचा पाऊस पडेल. याला पुरे पडणे हे सोपे नाही. त्यातच सेनेमधून रोज माणसे फोडणे भाजपने चालूच ठेवले आहे. अगदी शेवटच्या घटकेपर्यंत कोण कोलांटउडी मारून भाजपमध्ये जाईल हे सांगता येणे कठीण आहे. त्यातच महाविकास आघाडीतील काँग्रेसने गेल्या काही दिवसांपासून एकट्याने लढण्याची भाषा चालवली होती. मुंबईतील मुस्लिम व दलितांमध्ये काँग्रेसला चांगले स्थान आहे. यांच्या जोरावर आपण स्वतःची निश्चित अशी ताकद उभी करू शकतो असे त्या पक्षाला वाटते. ही मते सेनेला जातात, पण सेनेची मराठी मते काँग्रेसला मिळत नाहीत असाही काँग्रेसचा समज आहे. शरद पवार यांच्या पक्षाची मुंबईत जवळपास शून्य ताकद आहे. या स्थितीत ठाकरे यांना अधिकच्या आधाराची गरज होती. म्हणूनच उद्धव व राज यांची मुंबईतील मराठी माणसाच्या हिताच्या रक्षणासाठी दोन भाऊ राग-लोभ बाजूला ठेवून एकत्र आले हा भावनिक मुद्दा आपल्याला उपयोगी पडेल असा हिशेब त्यांनी केला असावा. मराठी मतदार याला कसा प्रतिसाद देतील हे पाहावे लागेल.

### आव्हान मोठे आहे

गेल्या काही वर्षात राज ठाकरे यांची ताकद क्रमाक्रमाने क्षीण झाली आहे. मनसे स्थापन झाल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत त्यांचे १३ नगरसेवक निवडून आले होते. आता त्यांच्याकडे जवळपास शून्य भोपळा आहे. भाजपला त्यांची गरज उरलेली नाही हे विधानसभेला स्पष्ट झाले. त्यामुळे त्यांनाही पुन्हा एखाद्या भावनिक मुद्द्याची व मजबूत पक्षाच्या आधाराची गरज होतीच. ठाकरे यांच्यासोबत जाण्याने ती पूर्ण होणार आहे. मात्र ही युती गेल्या विधानसभेनंतर लगेचच झाली असती तर अधिक फायद्याचे झाले असते. प्रत्यक्षात मुंबई पालिका निवडणुकांची घोषणा झाली व उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ आली तरीही युतीबाबत अनिश्चितता दिसून आली. ती संपवण्यासाठी अखेर बुधवारी घाई करण्यात आली. पण मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेले आहे. हे बंधू एकत्र यावेत ही मराठी माणसांची व त्याहूनही अधिक म्हणजे शिवसेना कार्यकर्त्यांची इच्छा होती. पण यातले अनेक जण आता भाजपच्या गोटात दाखल झाले आहेत. मुंबई आता पूर्वीची राहिलेली नाही. मराठी लोकांना मुंबईवर आपला हक्क आहे असे वाटत असे. हा हक्क शाबित करण्यासाठी शिवसेना ही त्यांना उपयोगी पडे. पण आता मुंबईत मराठी माणसाचे विशेष स्थान संपले आहे. गुजराती, हिंदी, मुसलमान असे इतर समाज जसे आहेत तसाच एक मराठी समाजही आहे अशी स्थिती निर्माण झाली आहे. मराठी लोकांची संख्या जेमतेम २८ ते ३० टक्के उरली आहे. त्यातही अनेक जण भाजपच्या हिंदुत्वाला आणि शिंदे गटाच्या पैशांना बळी पडले आहेत. ठाकरे नावाची जादू मिडियाने कितीही उगाळली तरी कमी झाली आहे. त्यामुळे शिवसेना व मनसे एकत्र आल्याने जादूच्या कांडीप्रमाणे सर्व वातावरण बदलेल अशी आशा करण्यात अर्थ नाही. त्यातच एकत्र येताना हे दोन्ही नेते सर्व महापालिकांमध्ये एकत्र येऊ किंवा यापुढे आमची कायमची युती झाली असेही सांगू शकलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही बाजूंमध्ये व मतदारांमध्ये अविश्वास राहणार आहे. यावर मात करणे आणि २३ दिवसात वातावरण फिरवणे हे ठाकरे बंधूंपुढचे मोठे आव्हान राहणार आहे.

विचार

# मैत्रीचा नवा अध्याय

***कोणत्याही पक्षाचे सरकार असले, तरी भारत-रशिया संबंधांमध्ये सातत्य आहे. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात अमेरिकेशी संबंध अधिक मजबूत झाले असले, तरी रशियाशी बिघडले नाहीत. आता डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे अमेरिकेशी भारताचे संबंध बिघडले असताना रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांनी भारताचा दौरा केला. या परिषदेत मोदी यांच्याबरोबर झालेल्या १९ करारांमधून मैत्रीचा नवा अध्याय लिहिला गेला.***

आरिफ शेख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत वार्षिक शिखर परिषदेसाठी व्लादीमिर पुतीन भारतात येणे ही जागतिक राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड आहे. त्याचे कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाशी केलेल्या कच्च्या तेल खरेदीमुळे भारतावर अतिरिक्त शुल्क आकारले. ट्रम्प रशिया आणि भारताची कोंडी करत असताना पुतीन यांनी भारतात येऊन कच्च्या तेलाचा पुरवठा अखंड सुरू ठेवण्याची हमी देणे तसेच पुतीन यांचे भारतात पोहचण्याआधीच रशियाच्या संसदेने संरक्षण करारावर सह्या करणे या बाबी ट्रम्प यांच्या निर्बंधाला आपण जुमानत नाही, असा संदेश देणाऱ्या होत्या. भारत-रशिया भागीदारी ही काही स्थिर, हितसंबंधांवर आधारित संबंधांपैकी एक आहे. त्यात व्यापक भू-राजकीय परिदृश्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता आहे. संरक्षण सहकार्य हा पुतीन यांच्या भेटीचा केंद्रबिंदू राहिला आहे, जो भारत-रशिया संबंधांचा दीर्घकालीन आणि मजबूत पाया आहे. गेल्या काही दशकांमध्ये, भारताचे अर्ध्याहून अधिक लष्करी प्लॅटफॉर्म रशियाने बनवले आहेत आणि हे संबंध साध्या खरेदीदार-विक्रेत्या संबंधांपासून खोल सह-विकासात विकसित झाले आहेत. ब्राह्मोससारखे संयुक्त प्रकल्प दोन्ही देशांमधील उच्च धोरणात्मक विश्वासाची साक्ष देतात. विस्तारित श्रेणी, सुधारित अचूकता आणि हायपरसोनिक तंत्रज्ञानातील उदयोन्मुख सहकार्यासह भारत- रशिया संरक्षण भागीदारी एका नवीन तांत्रिक युगात प्रवेश करत आहे. भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेचा विस्तार आणि लढाऊ विमान वाहतूक आणि पाणबुडी तंत्रज्ञानातील सखोल सहकार्यावरील चर्चा या दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारीप्रती वचनबद्धता दर्शवते.

या सर्वोच्च पातळीवर संरक्षण संबंधांना मान्यता देऊन भारत आपली धोरणात्मक स्वायत्तता मजबूत करतो. अमेरिकेशी मजबूत संबंध निर्माण करत असताना आणि 'क्वाड'मध्ये सक्रियपणे सहभागी होत असताना भारताने कधीही कोणत्याही एका शक्तीला त्याचे धोरण ठरवू दिलेले नाही. हा बहुआयामी दृष्टिकोन एक स्पष्ट जागतिक संदेश देतो. भारताला वैचारिक गटांमध्ये अडकवले जाऊ शकत नाही. त्याऐवजी, तो आपल्या राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणारी विविध संरक्षण भागीदारी राखेल. भारताचे सातत्यपूर्ण संरक्षण हीत रशियाला आशियामध्ये धोरणात्मक प्रभाव राखण्यास मदत करते आणि चीनवर जास्त अवलंबून राहण्यापासून रोखते. त्यामुळे हळूहळू जागतिक शक्तीसंतुलन बदलू शकते. तथापि, भारत-रशिया संबंधांचे खरे परिवर्तन व्यापार, शुल्क, ऊर्जा प्रवाह आणि उदयोन्मुख आर्थिक संरचनांच्या क्षेत्रात पहायला मिळत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारत-रशियामध्ये द्विपक्षीय व्यापार वाढला आहे. तो प्रामुख्याने रशियाकडून भारताच्या स्वस्त कच्चे तेल, खते, कोळसा आणि आवश्यक खनिजांच्या आयातीमुळे चालतो. रशियाने आशियामध्ये ऊर्जा निर्यातीत केलेल्या बदलामुळे भारताला स्पर्धात्मक किमतीत दीर्घकालीन ऊर्जापुरवठा सुरक्षित करण्याची एक अनोखी संधी मिळाली आहे. हे बदल केवळ आर्थिकच नाही, तर भू-राजकीयदेखील आहे.

पाश्चात्य देशांच्या नापसंतीला न जुमानता, रशियाकडून तेल खरेदी करून, भारताने आपले सार्वभौमत्व पुन्हा सिद्ध केले आणि महागाईप्रवण संकटापासून आपल्या अर्थव्यवस्थेचे रक्षण केले. तथापि, या व्यापार वाढीमुळे सतत असमतोल उघड झाला आहे. भारत रशियाला तुलनेने कमी निर्यात करतो. त्यामुळे रशियन बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात रुपया अधिशेष जमा झाला आहे. पुतीन यांच्या भेटीत आता दोन्ही देशांमध्ये शंभर अब्ज डॉलरचा व्यापार करार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. डॉलर मजबूत होत असताना भारत आणि रशियाचा व्यापार रुपया-रुबल किंवा स्थानिक चलन सेटलमेंटचा वापर डॉलर-आधारित प्रणालीवरील अवलंबित्व कमी करू शकतो, जी निर्बंधांप्रती असुरक्षित आहे. भारतीय औषधनिर्माण, यंत्रसामग्री, कृषी उत्पादने आणि आयटी सेवांसाठी बाजारपेठेतील प्रवेश वाढवणे व्यापार असंतुलन सुधारण्यास मदत करू शकते. व्यापक दृष्टिकोनातून पाहता हे बदल डॉलर-आधारित वित्तीय प्रणालीपासून दूर जाण्याचे संकेत देतात.

भारत आणि रशिया नवीन आर्थिक मार्ग शोधत आहेत, जे व्यापक 'ब्रिक्स' आणि जागतिक दक्षिणेला पर्यायी पेमेंट सिस्टीम तयार करण्यास प्रेरित करू शकतात. अशा यंत्रणा दोन्ही देशांच्या आर्थिक सार्वभौमत्वाला बळकटी देतील. त्यामुळे त्यांना पाश्चात्य-प्रेरित व्यापार राजकारणाला अधिक प्रभावीपणे सामोरे जाता येईल. सांस्कृतिक सहकार्य हे भारत-रशिया संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. संरक्षण करार आणि ऊर्जा करारांपूर्वी, सिनेमा, साहित्य आणि संगीत त्यांच्या संबंधांचा पाया होता. एके काळी राज कपूरच्या चित्रपटांनी सोव्हिएत थिएटर भरली होती. टॉलस्टॉय आणि दोस्तोव्हस्कीसारख्या रशियन अभिजात कलाकृतींनी भारतीय लेखकांवर खोलवर प्रभाव पाडला. हा सांस्कृतिक पूल आजही महोत्सव, शैक्षणिक देवाणघेवाण, नाट्य सहयोग, भाषा कार्यक्रम आणि सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळांद्वारे जिवंत आहे. पुतीन यांच्या भेटीमुळे डिजिटल प्लॅटफॉर्म, सह-निर्मित चित्रपट आणि संग्रहालय भागीदारीद्वारे या सांस्कृतिक सहकार्याला आधुनिकीकरण करण्याची संधी मिळाली. भारत-रशिया सहकार्याचा एक नवीन आणि वेगाने वाढणारा आधारस्तंभ म्हणजे शैक्षणिक आणि मानवी संसाधन देवाणघेवाण. भारताने आपली विद्यापीठे आणि कामगार बाजारपेठा विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयटी आणि बांधकाम क्षेत्रातील विद्यार्थी आणि कुशल कामगारांसाठी खुल्या केल्या आहेत. ही मानवी देवाणघेवाण दीर्घकालीन सहकार्याचा आधार बनेल, कारण भारत डिजिटल प्रशासन, फिनटेक आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रात तज्ज्ञता प्रदान करतो. पुतीन यांची भेट केवळ औपचारिक नाही, तर दोन्ही देशांसाठी खोल धोरणात्मक महत्त्वाने भरलेली आहे. पाश्चात्य अलिप्ततेच्या प्रयत्नांना न जुमानता, रशियाचे जगभरात मजबूत, सार्वभौम भागीदार आहेत, हे या भेटीतून ठसवण्याचा रशियाचा प्रयत्न होता.

बहुध्रुवीय जगात दोन्ही देश आपली भूमिका पार पाडत असताना, होणारे सहकार्य केवळ त्यांचीच स्थिती मजबूत करणार नाही, तर जागतिक शक्ती गतिमानतेचे भविष्यदेखील आकार देईल. भारत आणि रशियामधील संबंध जवळजवळ आठ दशकांपासून आहेत आणि दोन्ही देशांनी नेहमीच सहकार्यासाठी दारे उघडी ठेवली आहेत. पुतीन यांचा दोन दिवसांचा भारत दौरा हा भारत-रशिया संबंध मजबूत करण्यासाठी एक नवीन टप्पा ठरला. तथापि, ज्या परिस्थितीत पुतीन यांनी या वेळी भारताला भेट दिली, भारताची भूमिका खुल्या मनाने समजून घेतली आणि सहकार्य मजबूत करण्यासाठी एकत्र काम करण्यास सहमती दर्शविली, ती महत्त्वाची आहे. अमेरिकेने दंडात्मक शुल्क आणि निर्बंधांच्या अलिकडच्या घोषणेमुळे एक जटिल आंतरराष्ट्रीय परिस्थिती निर्माण केली आहे. परिणामी, प्रभावित देशांना आता नवीन पर्याय शोधण्याचे आव्हान भेडसावत आहे. या संदर्भात, भारत आणि रशियाने दोन्ही देशांमधील विद्यमान आर्थिक आणि व्यापार भागीदारी मजबूत करण्यासाठी पंचवार्षिक योजनेवर सहमती दर्शवली. दोन्ही देशांमध्ये नेहमीच पारंपारिक मैत्री राहिली आहे, परस्पर आणि दीर्घकालीन हितसंबंधांवर आधारित संबंधांव्यतिरिक्त भारत आणि रशियामध्ये अनेक मुद्द्यांवर नूतनीकरण करारदेखील झाला आहे. पुतीन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर संरक्षण, व्यापार, ऊर्जा आणि आर्थिक सहकार्य यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये भागीदारी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे या दोन देशांमधील वार्षिक द्विपक्षीय व्यापार शंभर अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. नवोपक्रमासाठी लोकांची वाढती जागतिक गरज लक्षात घेता दोन करार झाले आहेत. त्यामुळे दोन्ही देशांमधील मानवी श्रमांची हालचाल नवीन शक्ती आणि संधीचे साधन बनेल.

रशिया वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला इंधनाचा अखंड पुरवठा सुरू ठेवण्यास तयार आहे आणि 'मेक इन इंडिया'लाही पाठिंबा देईल. मोदी आणि पुतिन व्यापार वाढवण्यासाठी मोठ्या योजना आखत आहेत. भारताला त्याच्या व्यापार आणि गुंतवणूक क्षेत्रात अधिक विविधता, संतुलन आणि स्थिरता प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. पुतीन यांच्या भेटीनंतर आणि अनेक मुद्द्यांवर झालेल्या करारांनंतर, भारत आणि रशियामधील संबंधांना नवी गती मिळेल. दोन्ही बाजूंनी सुरक्षा, अर्थव्यवस्था, व्यापार आणि संस्कृती या क्षेत्रात सहकार्याला प्राधान्य देण्याचा संकल्प केला आहे. भविष्यात नवीन भू-राजकीय परिस्थिती उद्भवू शकते; परंतु केवळ एक न्याय्य आणि बहुध्रुवीय जगच नवीन जागतिक आव्हानांना तोंड देऊ शकेल. यामध्ये रशिया आणि भारत यांच्यातील सहकार्य महत्त्वाची भूमिका बजावू शकते. २०१४ मध्ये मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' सरकार सत्तेवर आल्यानंतर धोरणात्मक बदल झाला आणि सरकारने संरक्षण पुरवठ्यात विविधता आणण्याचा निर्णय घेतला. भारताने रशिया, तसेच अमेरिका, फ्रान्स आणि इस्रायलकडून शस्त्रे आणि संरक्षण उपकरणे खरेदी केली. एके काळी भारताने रशियाकडून ८० टक्के लष्करी उपकरणे खरेदी केली होती; परंतु आता हा आकडा ३६ टक्क्यांपर्यंत घसरला आहे.

रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाले आणि रशियाने भारताला सवलतीच्या दरात तेल पुरवठा देऊ केला. आपले राष्ट्रीय हीत लक्षात घेऊन भारताने अमेरिका आणि पाश्चात्य देशांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी केले. आज भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. परिणामी, रशियाला अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात भारतासोबत सहकार्य वाढवायचे आहे. पुतीन यांच्या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये झालेल्या करारांवरून दिसून येते, की दोन्ही देश बहुआयामी संबंधांकडे वाटचाल करत आहेत. दोन्ही देशांनी आरोग्य, शिक्षण, कार्यबल, जहाजबांधणी आणि बंदरे या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे मान्य केले आहे. २०२४-२५ आर्थिक वर्षात भारत आणि रशियामधील द्विपक्षीय व्यापार ६८.७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. यापैकी रशियाची निर्यात ६३ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे, तर भारताची निर्यात पाच अब्ज डॉलर्सपेक्षा कमी आहे. परिणामी, भारताची व्यापार तूट लक्षणीय राहिली आहे. या व्यापार असमतोलावर मात करण्यासाठी रशिया भारताकडून तांदूळ, सागरी उत्पादने आणि प्रवासी विमाने खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करत आहे.

# अपघात रोखणे प्रत्येकाची जबाबदारी



अंतरा पारंगे

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. जिल्ह्यात वेगवेगळी वाहने खरेदी क्रेझ वाढत आहे. वेगवेगळ्या रंगाची आकाराची गाडी अनेकांच्या दारात दिसून येत आहे. मात्र रस्त्यांवरील अरुंद रस्ते,खड्डे, अपुर्ण अवस्थेत असलेले रस्ते, वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन अशा अनेक कारणांमुळे अपघात होण्याची भिती कायमच आहे. अपघात रोखण्यासाठी वाहतूक शाखेकडून दहा सुवर्ण नियम लागू केले आहेत. या नियमांचे पालन केल्यास अपघात रोखता येणार आहे. त्यात अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने काम केल्यास अपघात टाळता येतील. याकडे प्रत्येकाने लक्ष देणे गरजेचे आहे.

मुंबई - गोवा महामार्गासह, द्रुतगती महामार्ग, जिल्हा मार्ग व अन्य रस्त्यांवरुन वाहनांची वर्दळ वाढत आहे. दुचाकी वाहनांसह चारचाकी व अन्य वाहनांची संख्याही रस्त्यावर वाढू लागली आहे. अलिबाग - वडखळ हा महत्वाचा रस्ता म्हणून ओळखला जातो. या रस्त्यावरून हजारो वाहनांची वर्दळ असते.या मार्गावर वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमच आहे. त्यात खड्डे चुकविताना अपघात होण्याच्या घटनाही घडत आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत प्रशासन उदासीन ठरले आहे. त्यामुळे पडलेल्या खड्ड्यातून वाहन चालविण्याची वेळ चालकांवर येत आहे. काही वाहन चालक त्यांच्या निश्चित स्थळी लवकर जाण्याच्या नादात वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालवितात.मुंबई गोवा महामार्गाचा प्रश्नही गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या मार्गाचे काम संथ गतीने सुरु असल्याने प्रवास करताना चालकांना व प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. या मार्गावर अनेकवेळा अपघात झाले आहेत. जिल्हयातील वाढत्या अपघातामुळे अनेक जीव गमवावा लागत आहे. काहींना गंभीर दुखापत झाल्याने कायमचे अपंगत्व आले आहे. जिल्ह्यातील काही भागातील अरुंद रस्ते, निकृष्ट दर्जाचे रस्त्याचे काम, ठिकठिकाणी असलेले खड्डे तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून वाहन चालविणे अशा अनेक कारणामुळे जिल्ह्यात अपघात होण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. मागील तीन वर्षाच्या आकडेवारीनुसार, जिल्हयात दोन हजारहून अधिक अपघात झाले आहेत. या अपघातामध्ये ७८४ जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेमार्फत कारवाई तसेच चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जातो. तरीदेखील वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणारे महाभाग जिल्हयात आजही आहेत. या बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून केला जात आहे.

वाढत्या लोकसंख्येबरोबरच दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या, खराब रस्ते आणि प्रवाशांकडून होणारे वाहतूक नियमांचे उलंघन इत्यादी कारणांमुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत आहे. त्यामुळे रस्ते सुरक्षेची स्थिती पुन्हा चिंताजनक बनली आहे. रस्ते अपघातांमुळे केवळ जीवित आणि मालमत्तेची हानी होत नाही तर कुटूंबातील प्रमुखाला गमविण्याची वेळ नातेवाईकांवर येते.अतिवेगाने वाहने चालवणे, मद्य सेवन करून वाहन चालवणे, हेल्मेटचा वापर न करणे, सीट बेल्टच ा वापर न करणे, वाहन चालवताना मोबाईल फोन वापरणे, ट्रीबलशीट असणे, ज्यादा प्रवासी वाहतूक करणे हे प्रकार कायमच घडत आहेत. बऱ्याच ठिकाणी रस्त्याचे काम सुरु असताना ठेकेदारांकडून फलक लावला जात नाही. रस्त्यांच्या अपूर्ण कामांमुळेही अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी आधीच अरूंद असलेल्या रस्त्याच्या कडेला काही मंडळी अतिक्रमण करतात. त्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्याच्या बाजूने चालताना अडथळे निर्माण होतात. अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेमार्फत कारवाई तसेच चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जातो. तरीदेखील वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणारे महाभाग जिल्हयात आजही आहेत. या बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून केला जात आहे. यावर उपाय म्हणून, पोलिसांनी वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे. जनजागृती मोहीम राबवून लोकांना नियमांचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, अपघात कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर दिला जात आहे. त्यामुळे, नागरिकांनीही वाहतुकीचे नियम पाळून आणि सावधगिरीने वाहन चालवून पोलिसांना सहकार्य करणे आवश्यक आहे. केवळ पोलीसच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे की त्यांनी रस्ते सुरक्षित ठेवण्यासाठी आपले योगदान द्यावे.

## लोकसंसद

### चांदीचे भाव भिडले गगनाला!

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वेगवान आर्थिक घडामोडी आणि सततच्या वाढत्या मागणीमुळे सोन्या-चांदीच्या दरात वेगाने वाढ होत आहे. विशेषतः चांदीचे दर द्रुतगतीने वाढत आहेत. ३१ डिसेंबर २०२४ रोजी ८९७०० रुपये प्रतिकिलो असणारी चांदी १४३३०० रुपयांनी वाढून २४ डिसेंबर २०२५ रोजी तब्बल २३३००० रुपये प्रतिकिलो वर जाऊन पोहोचली आहे. गुंतवणुकीचा सर्वाधिक सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याने यावर्षी अंदाजे ७८ टक्के परतावा दिला असताना चांदीने मात्र गुंतवणूकदारांना १४२ टक्क्यांचा विक्रमी परतावा देऊन मालामाल केले. चांदीचे भाव कल्पनेच्या पलिकडे गेले असून २०२५ मध्ये ज्या वेगाने चांदीच्या किंमतींनी नव नवे शिखर गाठले त्यावरून चांदी २०२६ मध्ये तीन लाखांचा टप्पा सहज पार करेल असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तविला आहे. सोलर पॅनल, इलेक्ट्रिक व्हेइकल, इलेक्ट्रॉनिक उद्योग तसेच ग्रीन एनर्जीशी संबंधित उद्योग क्षेत्रात वाढलेला चांदीचा वापर, डॉलरच्या तुलनेत रुपयाची होत असलेली घसरण, सुरक्षित गुंतवणूक म्हणून चांदीकडे वाढलेला गुंतवणूकदारांचा कल, चांदीच्या मागणी आणि पुरवठ्यातील तफावत तसेच जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती यामुळे चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा चांदीचा ग्राहक असल्यामुळे (भारतात दरवर्षी अंदाजे ४००० टन चांदी वापरली जाते) भारताला या वाढीचा सर्वाधिक फटका बसतो आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

### देशातील ओरिसा राज्यात आमदारांना सर्वात जास्त पगार

नुकतीच ओरिसा येथील आमदारांना तब्बल २०० टक्के एवढी पगार वाढ दिल्याचे वाचले. येथे राज्याचे दरडोई उत्पन्न १.६ लाख एवढे आहे. आता ओरिसा राज्यात आमदारांचे सरासरी वेतन ३.४ लाख एवढे आहे जे देशातसर्वाधीक आमदारांच्या मध्ये जास्त झाले आहे. त्या खालोखाल तेलंगणा राज्याचा नंबर लागतो तेथे आमदारांचे सरासरी वेतन २.७ लाख एवढे आहे. तर तेथील दरडोई उत्पन्न २.६ लाख एवढे आहे. तिसऱ्या नंबरवर महाराष्ट्र आहे. येथील आमदारांचे सरासरी वेतन २. ६ लाख रुपये आहे. महाराष्ट्रातील सरासरी दरडोई उत्पन्न २.७ लाख एवढे आहे. सर्वात कमी उत्पन्न केरळ राज्यातील आमदारांचे असून ते ०.७ लाख एवढे कमी आहे. तेथील दरडोई उत्पन्न २.८ लाख एवढे आहे. देशातील अशी नऊ राज्ये आहेत कि जेथे आमदारांचे मासिक वेतन राज्याच्या दरडोई उत्पनापेक्षा जास्त आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते.

जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२५ डिसेंबर**

१) श्री.सुभाष पुंडलिक संसारे झिराड, अलिबाग, २५-१२-१९४६
२)श्री.मोहन विठ्ठल कुंटे बाजारपेठ, अलिबाग, २५-१२-१९५३
३)श्री.भगवान दगडू नागोठणेकर चेंढरे-अलिबाग २५-१२-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# कुंभेरी नदीला प्रदूषणाचा विळखा

## पडघा परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

भिवंडी तालुक्यातील मुंबई-नाशिक महामार्गालगत असलेल्या भातसा नदीची उपनदी असलेल्या कुंभेरी नदीचे प्रदूषण पुन्हा गंभीर झाले आहे. कुंभेरी नदीच्या पाण्यावर हिरवा तवंग दिसू लागला. त्यामुळे पडघा परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

काही महिन्यांपूर्वी जलपर्णीमुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले होते. अवकाळी पावसामुळे जलपर्णी वाहून गेली होती; मात्र पुन्हा एकदा प्रदूषणाने कुंभेरी नदीला घेरले आहे. स्थानिकांनी वारंवार आवाज उठवूनही प्रदूषण रोखण्याबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ, तहसील कार्यालय तसेच संबंधित यंत्रणांनी नदीपात्राची पाहणी केली असली तरी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. नदीपात्रातील दुर्गंधी, पाण्यातील शेवाळ आणि डासांची वाढ पाहता परिसरात साथीच्या आजारांचा धोका वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे.



### नागरिकांची नदीकाठाकडे पाठ

नदीकिनारी असलेल्या प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदिरामुळे या नदीला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. दरवर्षी शिवरात्री महोत्सवासाठी हजारो भाविक येथे दर्शनसाठी येतात. पडघा ग्रामपंचायतीने लाखो रुपये खर्च करून घाट, पथदिवे व विसर्जन व्यवस्था केली आहे. मात्र नदीची बिकट स्थिती पाहता नागरिकांनी नदीकाठाकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

कुंभेरी नदी अनेक गावांच्या पाणीपुरवठ्याचे प्रमुख साधन आहे. भाजीपाला उत्पादन, शेती, मासेमारी तसेच आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह या नदीवर अवलंबून आहे. नदीतील हानीकारक शैवाल वाढीमुळे सूक्ष्म पोषक वाढल्यामुळे आणि रसायनामुळे ऑक्सिजनचा पुरवठा कमी होऊन पार्किन्सन, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल विकार, किडनी विकार यासारखे रोग होतात. सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा नियोजनाचा प्रकल्प अहवाल संबंधित विभागाकडे जमा करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. स्नेहल दोंदे यांनी दिली.

> **"पाण्यात नायट्रोजन व फॉस्फरसचे प्रमाण वाढल्याने शेवाळाचा फैलाव होतो. यामुळे नदीतील ऑक्सिजन कमी होऊन जलचर मृत्यूमुखी पडतात. पाणी दूषित होत असून भूजल पुनर्भरणावर परिणाम होत आहे. प्रदूषण रोखण्यासाठी मानवी हस्तक्षेप कमी करणे आणि नदीची नियमित स्वच्छता आवश्यक आहे."**
> **– डॉ. दिलीप काकावीपुरे, पर्यावरण तज्ज्ञ**

## महायुतीकडून स्वत:चे खिसे भरण्याचे काम

### सचिन सावंतांचा हल्लाबोल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई महानगरपालिकेतील प्रशासक राजच्या माध्यमातून भाजपा महायुती फक्त स्वत:चे खिसे भरण्याचे काम करत आहे. मुंबईतील रस्ते, प्रदुषण, आरोग्य सुविधा याकडे सत्ताधाऱ्यांचे साफ दुर्लक्ष केलेले आहे. आता कांजूरमार्गच्या डंपिग ग्राऊंडवरून न्यायालयाने बीएमसीला फटकारले आहे. तसेच वायूप्रदूषणावरही न्यायालयाने मुंबई महानगरपालिका आयुक्तांवर ताशेरे ओढले. महायुतीच्या कारभाराने मुंबईच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली आहेत, असा गंभीर आरोप करत मुंबईकरांना स्वच्छ हवाही देऊ न शकणाऱ्या अकार्यक्षम महायुतीला निवडणुकीत थारा देऊ नका, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन सावंत यांनी केले आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना सचिन सावंत म्हणाले की, रस्त्यावरील खड्ड्यांच्या मुद्द्यावर न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला दंड ठोठावला, हवेतील प्रदुषणाची न्यायालयाला दखल घ्यावी लागली, ताशेरे ओढले आणि स्वतः लक्ष घातले. आता कांजूर डंपिंग ग्राऊंडमुळे होणाऱ्या दुर्गंधीबाबत तासाभरात निर्णय घ्या, असा आदेश मुंबई महानगरपालिकेला न्यायालयाने दिला. प्रत्येक बाबतीत माननीय न्यायालयालाच दखल घ्यावी लागत असेल तर सत्तेत बसून भाजपा महायुती काय झोपा काढते काय? गेली तीन वर्षे प्रशासकाच्या माध्यमातून सत्ता राबविणाऱ्या महायुतीची अकार्यक्षमता यातून स्पष्ट दिसते. मुंबईकरांच्या प्रश्नांवर भाजपा महायुतीचा एकही नेता अवाक्षरही काढत नाही. आपला कुचकामीपणा दिसू नये म्हणून नेहमीप्रमाणे धर्माच्या नावाने विवाद निर्माण केला जात आहे.

मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर व देशाची आर्थिक राजधानी आहे. परंतु, केंद्रात व राज्यात भाजपाची सत्ता असूनही मुंबईचा फारसा विकास झालेला नाही. लाडका उद्योगपती व कंत्राटदार यांच्यासाठी मुंबई विकण्यास काढली आहे. मुंबईकरांना मुलभूत सुविधाही देऊ न शकणाऱ्या भाजपा महायुतीला आता महानगरपालिकेच्या निवडणुकीत घरी बसवा, असेही सावंत म्हणाले.

## थंडीमध्ये गुळाची मागणी वाढली

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

हिवाळ्याची चाहूल लागताच गुळाच्या मागणीत लक्षणीय वाढ होते. कारण थंडीत शरीराला उष्णता देणारा व आरोग्यास गूळ हा फायदेशीर मानला जातो. त्यामुळे या दिवसात गुळाचे पदार्थ अधिक बनवले जात असून मकर संक्रांतीला त्याचा वापर अधिक होतो. त्यामुळे बाजारपेठांमध्ये आतापासूनच गुळाची विक्री चांगलीच वाढली आहे.

विशेषतः पातळ पोळी, भाजी, तिळगूळ, चहा व औषधी उपयोगासाठी गुळाचा वापर वाढल्याने किरकोळ व घाऊक बाजारात उलाढाल वाढली आहे. सध्या सेंद्रिय व देशी गुळाला अधिक मागणी असून, दर्जेदार गुळासाठी ग्राहक थोडी जास्त किंमत मोजण्यासही तयार आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, मागणी वाढल्याने गुळाच्या दरात सौम्य वाढ झाली असली तरी पुढील काही आठवड्यांत दर स्थिर राहण्याची शक्यता आहे. ऊस गाळप हंगाम सुरू झाल्याने बाजारात नव्या गुळाची आवक वाढत असून, त्यामुळे ग्राहकांना ताजा गूळ उपलब्ध होत आहे.

आरोग्याबाबत वाढलेली जागरूकता आणि हिवाळी पदार्थांची मागणी यामुळे यंदा गुळाचा बाजार तेजीत असल्याचे चित्र दिसत आहे. पुढच्या महिन्यात मकर संक्रांत असल्याने गुळाच्या मागणीत आणखीन वाढ होणार असल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात आले.

## 'हिंदू अल्पसंख्याक होण्याच्या मार्गावर'

**नेरळ** : नेरळ येथे विश्व हिंदू परिषदेच्या कोकण प्रांत सीटवर मातृशक्ती संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या प्रमाणात महिलांचा सहभाग असलेल्या संमेलनात एका चर्चासत्रात विष्णू हिंदू परिषदेचे केंद्रीय धार्मिक प्रचार प्रमुख ॲड. दीपक गायकवाड यांनी हिंदू धर्म धोक्यात आला असून हिंदू अल्पसंख्याक होण्याची भीती व्यक्त केली. नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी कोकण प्रांत मातृशक्तीच्या सह-संयोजक उज्ज्वला शेट्टी यांनी बाल संस्कार वर्गाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रत्येक मातृशक्तीची समाजाप्रती असलेली जबाबदारी समजावून सांगितली आणि बाल संस्कार कसे करावे, याबद्दल मुलांसोबत एक प्रात्यक्षिक आयोजित केले. यामध्ये विधी, प्रेरणादायी गाणी, उपदेशात्मक कथा आणि खेळ यांचा समावेश होता. समारोप सत्रात केंद्रीय धार्मिक प्रचार प्रमुख अधिवक्ता दीपक गायकवाड यांनी संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली हिंदूची व्याख्या आणि आज हिंदू धर्माची कशी फसवणूक होत आहे. त्यामुळे आपण अल्पसंख्याक होण्याच्या मार्गावर आहोत, हे स्पष्ट केले.

## अल्कालाईन पाण्याचा वापर करा

### डॉ.जयपाल पाटील यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी आपल्या शिवारात असलेले शेतघर, गाई-म्हशीचा गोठा, नारळ, आंबा बागायत यांना आग लागून अतोनात नुकसान होते. यासाठी शेताच्या सभोवार बांधापासुन आपल्या शेताकडील बाजूस जेसीपी लावून ५ फूट खोल चर खणून घ्यावा. काढलेल्या मातीवर बहुगुणी शेवगा, नारळ, हापूस आंबे लावून आर्थिक उन्नती करावी व आगीमुळे होणारी आपत्ती थांबवावी. तसेच, आरोग्य सुरक्षेसाठी अल्कालाईन पाण्याचा वापर करा, असे मार्गदर्शन छ. श्री शिवाजी महाराज लोक विद्यापीठ अमरावतीचे राष्ट्रीय संचालक, रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी केले. ते डेस्टिनीशन फॉरेस्ट अँग्रो टुरिस्ट सेंटर, सांबरीने आयोजित शेतकरी मेळाव्यात बोलत होते. प्रारंभी डॉ. जयपाल पाटील यांच्या हस्ते अल्कालाईन वॉटर संचाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले.



प्रास्ताविकामध्ये मेळावा आयोजक प्रगतिशील शेतकरी संतोष पाटील यांनी त्यांच्या शेतावर कृषी पर्यटनामधे १०० रुपयात पोटभर शाकाहारी व मांसाहारी जेवण, १५ हजार रुपयांपर्यंत निवास, चहा, नाश्ता, भोजन, वृध्दाश्रम आणि आरोग्यदायक अल्कालाईन पाणी जनतेसाठी अल्प दरात उपलब्ध करीत असल्याचे सांगितले.

यांनंतर डॉ. जयपाल पाटील यांनी शेतकऱ्यांनी आपली शेतकरी नोंद करून घेणे आवश्यक असून पुढे केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून विविध योजना मिळतील. वर्षभर आपल्या जमिनीनुसार किसान क्रेडिट कार्डवर वर्षभर बिनव्याजी पैसे वापरास मिळतात ते काढुन घ्यावे, प्रत्त्येक शेतावर गमबुटचा वापर सुरक्षेसाठी करावा. चुकून साप, विंचू चावलाच तर १०८ रुगणवाहिकेस बोलावून जिल्हा रुग्णालयात नेणे, महिला सुरक्षेबाबत महाराष्ट्र पोलीस ११२ क्रमांकवर संपर्क साधून सुरक्षित रहावे, असे सांगितले.

## योगिता चव्हाण यांना मातृशोक

**माणगाव** : माणगावच्या माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण यांच्या मोतोश्री वत्सला गजानन अधिकारी यांचे बुधवारी (दि.२४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर साई कोंड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय अंत्यविधीला उपस्थित होता. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि.२ जानेवारी तर उत्तरकार्य विधी रविवार दि.४ जानेवारी २०२६ रोजी राहत्या घरी (साई कोंड, ता.माणगाव) येथे होणार आहेत.

## अपघातात वृद्ध महिलेचा मृत्यू

**रत्नागिरी** : राजापूर तालुक्यातील रायपाटण टक्केवाडी येथे बुधवारी (दि.२४) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास एका भीषण अपघातात ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. पार्वती तानू तरळ (रा. शिवणे बुद्रुक) असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याच्या पिंपळे सौदागर येथील रहिवासी तेजस शेलार हे आपल्या क्रेटा गाडीने पुण्याहून कुणकेशश्वर येथे देवदर्शनासाठी जात होते. रायपाटण टक्केवाडी येथे त्यांची गाडी आली असता, पाचल गुरववाडी येथील दुचाकीस्वार कुणाल धावडे याने आपल्या दुचाकीने कारला मागून धडक दिली. या अनपेक्षित धडकेमुळे दुचाकीच्या मागे बसलेल्या पार्वती तरळ या रस्त्यावर पडल्या. याचवेळी रत्नागिरीहून पाचलच्या दिशेने जाणाऱ्या एका मालवाहू ट्रकच्या मागच्या चाकाखाली त्या आल्या. चाकाखाली चिरडल्या गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

## एसटीच्या हेल्पलाईनवर होणार विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



शालेय विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थी सुखरूप घरी जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला. अवघ्या काही दिवसानंतर ४०० हून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. बस वेळेवर न येणे, थांब्यावर न थांबणे यासह विविध तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे त्या तक्रारींचे निरसन करा व तक्रारदारांना कळवा, असे आदेश एसटी विभागाच्या महाव्यवस्थापकांनी रत्नागिरीसह राज्यातील एसटीच्या विभाग नियंत्रकांना परिपत्रकाद्वारे शुक्रवारी दिले आहेत.

शालेय बस वेळेवर येत नाही, बस फेरी बऱ्याच वेळेस रद्द होते, उशिरा लावली जाते, पास खिडकी बंद, विद्यार्थ्यांकरिता बस थांब्यावर थांबली नाही अशा तक्रारी हेल्पलाईनवर विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. त्यामुळे शालेय तक्रारीचे निवारण करावे तसेच तक्रारदारांना तक्रार निरसन केल्याचे सांगावे व सातत्याने एकाच प्रकारची तक्रार किंवा ठराविक फेरीवर तक्रार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे आदेश महाव्यवस्थापकांनी दिले आहे.

दरम्यान, रत्नागिरीतून ६ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व त्यांचे निरसन केले असल्याचे सांगण्यात आले आहे. परिवहन मंत्र्यांनी शालेय विद्यार्थिनीसाठी शाळेत वेळेत जावे, घरी लवकर जावे यासाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर करून तक्रार करण्यास आवाहन केले होते. यामुळे रत्नागिरीसह अन्य जिल्ह्यातून तक्रारींचा पाऊस पडला आहे.

**मुंबई उच्च न्यायालयाची मंजुरी** | **भाविकांना उत्तम, सुरक्षित व्यवस्था मिळणार**

# महालक्ष्मी मंदिराचा पुनर्विकास होणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील सुप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर व भोवतालच्या परिसरात इतर व सणासुदीच्या दिवसांत भाविकांची प्रचंड गर्दी होते. अपुरी जागा व मंदिराकडे जाणारा एकमेव अरुंद मार्ग, ही परिस्थिती लक्षात घेऊन मंदिर व्यवस्थापनाच्या मूळ योजनेत विशिष्ट बदल करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. मात्र, त्याचवेळी 'योजनेतील दुरुस्तीचा आणि संबंधित पुनर्विकासाचा उपयोग हा केवळ भाविकांकरिता उत्तम व सुरक्षित व्यवस्था निर्माण करण्यासाठी होईल. त्याचा व्यावसायिकीकरणासाठी वापर होणार नाही, याची खबरदारी घ्यावी', असे उच्च न्यायालयाने श्री महालक्ष्मी टेम्पल ट्रस्टला बजावले आहे.



याचिकाकर्त्यांची बाजू ऐकल्यानंतर योजनेतील प्रस्तावित बदल न्याय्य आहेत आणि ते ट्रस्टच्या उद्दिष्टांना बाधा पोहोचवत नाहीत. शिवाय सुमारे पाच दशकांपूर्वी, शेवटच्या सुधारणेनंतर सर्वच आघाड्यांवर खूप बदल झाल्याचे निरीक्षणही न्या. जैन यांच्या एकलपीठाने मंदिर विश्वस्तांची याचिका स्वीकारताना निरीक्षण नोंदवले. मंदिरात येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या, परंतु जागेची तीव्र कमतरता तसेच मूलभूत सुविधांचा अभाव आहे.

महालक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण असून, भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास सुरक्षेच्या दृष्टीने अडचण येऊ शकते, असेही न्यायालयाने नमूद केले. मंदिराच्या पुनर्विकासाला परवानगी देण्यामागे केवळ भाविकांसाठी मंदिर अधिक चांगले आणि सुरक्षित बनवण्याच्या उद्देश आहे. त्यामुळे मालमत्तेचे व्यावसायिक शोषण करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही, असा इशाराही न्यायालयाने दिला.

दरम्यान, या सुधारणांनुसार, ट्रस्टला विस्तारासाठी मालमत्ता खरेदी करण्याची किंवा भाड्याने घेण्याची, शेजारील इमारतींच्या पुनर्विकासाला मदत करण्याची, देशासह परदेशात महालक्ष्मीला समर्पित मंदिरे स्थापन करण्याची परवानगी मिळाली आहे. तसेच न्यायालयाने देणग्यांसाठी अधिक आर्थिक पारदर्शकतेची सक्ती केली आहे.

महालक्ष्मी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय एन. गुपचूप यांनी ही याचिका केली होती. या याचिकेत मंदिराबाहेरील अतिक्रमणाकडे लक्ष वेधले होते. या अतिक्रमणामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागते. मंदिराच्या परिसरातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसन योजनेसह मंदिराच्या आसपासच्या मालमत्तांच्या पुनर्विकासास परवानगी देण्याची मागणीही याचिकेत केली होती.

तत्पूर्वी, धर्मादाय आयुक्तांनी ट्रस्टने सादर केलेल्या योजनेत काही बदलांची सूचना केली होती आणि ते बदल विश्वस्तांनी स्वीकारले आहेत, अशी माहिती महाराष्ट्र धर्मादाय आयुक्तांचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त सरकारी वकील हिमांशू टक्के यांनी न्यायालयाला दिली.

# निवडक



## पंचशील आचरणात आणावे: भिक्षू

**रसायनी** : पंचशील पाच नैतिक नियमाने जीवन सुंदर जगता येते. प्राणी हत्या न करणे, चोरी न करणे, लैंगिक गैरवर्तन न करणे, खोटे न बोलणे आणि मादक पदार्थांचे सेवन न करणे हे जीवनात आचरणात आणल्यास जीवन सुंदर जगता येते. हे नियम व्यक्तीला नैतिक आणि शांत जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात, असे आंतरराष्ट्रीय भिकू ज्ञानज्योती माहथेरो यांनी सांगितले. पूज्य भिकू ज्ञानज्योती माहथेरो यांच्या नेतृत्वाखाली भिकू नागज्योती, भिकू शिलज्योती, भिकू धम्मवरो, ध्यानज्योती, शिलरत्न, बुधभूषण, राहुल बोधी व अन्य यांच्याबरोबर भीमा कोरेगाव येथे विजयी दिन साजरा करण्यासाठी देशातून पायी धम्म यात्रा काढली. ही धम्म यात्रा चौक येथे आली असता त्यांचा मुक्काम चौक येथे असून त्यांचे स्वागत भीमशक्ती नवतरुण मित्र मंडळ चौक शहर व रमाबाई महिला मंडळ चौक शहर यांनी वाजत गाजत केले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात उपदेशपर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, धम्म यात्रेचा मुख्य उद्देश बुद्धांचे उपदेश जनमानसात पोहोचवणे, आध्यात्मिक आणि वैयक्तिक विकास साधणे, शांतता प्रस्थापित करणे आणि नैतिक आचरणाला प्रोत्साहन देणे हा असतो.

## 'आरोग्यासाठी योगसाधना आवश्यक'



**आगरदांडा:** आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक शांतता अत्यंत महत्त्वाची असून, योगसाधनेतून मानसिक स्थैर्य लाभते. त्यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आणि निरोगी व आनंददायी जीवन जगण्यासाठी नियमित योगसाधना करावी, असे आवाहन डॉ. सुभाष म्हात्रे यांनी केले. ते मुरूड उन्नती मित्र मंडळ वसंतराव नाईक महाविद्यालय मुंबई विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्कार शिबीर कार्यक्रमावेळी बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. जनार्दन कांबळे, एनएसएस युनिट १०चे प्रमुख डॉ. गजानन मुनेश्वर, योगा प्रशिक्षक प्रमोद मसाल, माजी प्रभारी प्रा. डॉ. विश्वास चव्हाण, डॉ.सुभाष म्हात्रे आदिंसह प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रमोद मसाल यांनी ताडासन, शवासन, पद्मासन अशा विविध योगासनांचे प्रकार विद्यार्थ्यांना करून दाखविले.



## राष्ट्रीय शेतकरी दिन उत्साहात साजरा

**नेरळ** : भारतातील शेतकरी हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेतकऱ्यांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा केला जातो. भारताचे ५वे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांच्या जयंतीनिमित्त देशात २३ डिसेंबर रोजी किसान दिवस साजरा केला जातो. त्या अनुषंगाने म्हसळा तालुक्यातील पीएमश्री शाळा नं.१ येथे राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा करण्यात आला. यासाठी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी वेशभूषा धारण करून शाळेतील परसबागेत स्वतः काम करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी आकर्षक अशी परसबाग फुलवली असून परसबागेचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच या विद्यार्थ्यांनी शेती अवजारांचा उपयोग कसा केला जातो, याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी शाळेतील शिक्षक श्रीधर उमदी, इंदिरा चौधरी, जयश्री गायकवाड, दीपक मुंडे यांनी विशेष मेहनत घेतली.



## गिरीधर पिंगळे पुरस्काराने सन्मानित

**खरोशी** : आदर्श शिक्षक गिरीधर पिंगळे गुरुजी यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या अतुलनीय कामगिरीमुळे द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२५मध्ये उरण येथील द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशनच्या पंचविसाव्या महोत्सवात उरणचे माजी आ. मनोहर भोईर काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत, उपाध्यक्ष मनोज पडते, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, क्रीडा प्रमुख भरत म्हात्रे, महिला प्रमुख वैशाली घरत आदी मान्यवरांच्या हस्ते द्रोणागिरी भूषण पिंगळे यांना पुरस्कार देण्यात आला. पिंगळे यांनी आजपर्यंत केलेल्या वेगवेगळे पुस्तक संग्रह काव्यसंग्रह, विविध स्फूटलेखन, कविता यासह शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेले कार्य अतुल्य असल्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला.

## रायगड बँकेतर्फे ग्राहकांना प्रशिक्षण

**म्हसळा** : रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा म्हसळा यांच्या विद्यमाने ग्राहकांना प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शाखाधिकारी मंगेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात मुंडे यांनी गेल्या दहा वर्षात कोणताही आर्थिक व्यवहार न झालेल्या आणि रक्कम आरबीआयकडील डीईएएफ खात्यात वर्ग झालेल्या रकमा खातेदारांना परत मिळवून देण्याकरिता तसेच निष्क्रिय खाती पुन्हा कार्यान्वित करण्याच्या दृष्टिने १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने म्हसळा शाखेत दि.१५ डिसेंबर रोजी खातेदारांच्या आयोजित शिबिरास मुंडे यांनी उत्तमप्रकारे मार्गदर्शन केले. यामध्ये खातेदारांनी केवायसी आणि अन्य बँकिंग व्यवहाराबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये १० खातेदारांच्या डीईएएफ झालेल्या रकमा परत आणून दिल्या. या प्रशिक्षणास म्हसळा हिंदू ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष नंदू गोविलकर प्रामुख्याने उपस्थित होते. बँकेचे अधिकारी विनोद धोकटे, विजय पयेर, योगेश कातकर, अभिजित जगताप, कैलास करडेल, दिपक, संदेश पाटील यांच्या सहकार्यामुळे शिबीर यशस्वी झाले. तर खातेदारांनी बँकेशी संपर्क साधून आपली रक्कम परत मिळविण्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन शाखाधिकारी मुंडे यांनी केले.

# बॉक्साइडचे क्षमतेपेक्षा जास्त उत्खनन

## || शासकीय यंत्रणेचे पुर्णपणे दुर्लक्ष || परिसरातील वनसंपत्ती-डोंगरांचा ऱ्हास

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइडची वाहतूक अत्यंत जोमात सुरू आहे. त्याचप्रमाणे बॉक्साइडचे उत्खनन परवानगी न घेता किंवा घेतलेल्या परवानगी पेक्षा जास्त पटीने करून अनेकांनी पैसे कमावण्याचा धंदा जोरात सुरू ठेवलेला आहे. मात्र, या सर्व प्रकाराकडे तालुका प्रशासनाने पूर्णपणे काणाडोळा केला आहे. क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट घेऊन जाणारे दहा चाकी डंपर बॉक्साइड खाणी पासून वडघर पांगलोली, त्याचप्रमाणे चांदोरे या ठिकाणी बॉक्साइडची वाहतूक करत असतात. याबाबत पेणचे प्रादेशिक परिवहन आधिकारी महादेव सूर्यवंशी यांच्याजवळ संपर्क साधला असता त्यांनी क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकीवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई संबंधितांवर करण्यात आलेली नाही. तसेच, तालुक्यात विविध राजकीय पक्षांशी संबंधित असलेले स्थानिक नेते आपल्या सोयीनुसार बॉक्साइडचा धंदा जोरात चालवण्यासाठी पक्षांतर करत असल्याचे देखील स्थानिकांकडून बोलले जात आहे.



तालुक्यात दिवसेंदिवस पर्यटन वाढत आहे. या ठिकाणी येणारा पर्यटक हा या ठिकाणच्या निसर्ग सौंदर्याची भुरळ पडल्यामुळे येत असतो. परंतु, या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइड उत्खनन करून श्रीवर्धन परिसरातील वनसंपत्ती व डोंगर पूर्णपणे उघडे होत चालले आहेत. डोंगराळ परिसरात खोलवर ड्रिलिंग करून स्फोट घडवले जात असून, उत्खननानंतर खड्डे बुजवणे अथवा पुनर्लागवड केली जात नसल्याने मोठ्या प्रमाणावर पोकळी निर्माण झाली आहे.

### भूस्खलनाची शक्यता

भविष्यात अशाच प्रकारे बॉक्साइड उत्खनन सुरू राहिले तर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भूस्खलनासारखे प्रकार घडण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे. पावसाचे पाणी साठल्यामुळे भूस्खलनाचा धोका वाढत चालला आहे.

पावसाचे पाणी साठल्यामुळे भूस्खलनाचा धोका वाढत चालला आहे. केरळमधील वायनाड येथील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचे दुर्लक्ष भविष्यात गंभीर संकटाला निमंत्रण देणारे ठरू शकते, असा इशारा जाणकार व्यक्त करत आहेत.

बॉक्साइडचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांना अटी व शर्ती घालून दिलेल्या असतात. त्यामध्ये बॉक्साइड उत्खनन केलेल्या ठिकाणी पुन्हा मातीचा भराव करून त्यावरती झाडे लागवड करण्याची अट आहे. परंतु, अशा प्रकारे कोणत्याही उत्खनन करणाऱ्या कंपनीकडून झाडे लावण्यात येत नाहीत.

बॉक्साईड उत्खनन करताना किती टनाची रॉयल्टी भरली आहे व किती टन बॉक्साईड काढले जात आहे, यावर कोणत्याही शासकीय यंत्रणेचे लक्ष नाही. या ठिकाणी 'आंधळ दळतंय कुत्र पीठ खातंय' या म्हणीच्या उक्ती प्रमाणे कारभार सुरू असल्याचे बोलले जात आहे. तसेच, क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइड वाहतूक व फॉरकॉन कंपनीच्या दगड वाहतुकीमुळे तालुक्यातील रस्त्यांची देखील बिकट अवस्था झाली आहे. त्यामुळे पेण येथील प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी या सर्व प्रकाराकडे डोळेझाक करत असल्याचे आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहेत. तसेच, प्रादेशिक परिवहन विभागाने क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतूकीवर कारवाई केली नाही, तर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेणार असल्याचे येथील नागरिकांनी बोलून दाखविले आहे.

---



## मुनवलीत दिनदर्शिकेचे प्रकाशन

| सोगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुनवली येथील हनुमान मंदिरात मंगळवार (दि.२३) डिसेंबर रोजी पूजा भगत यांच्या हस्ते ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगाव सन २०२६ सालचे दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

दिनदर्शिका प्रकाशन करण्यासाठी मापगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अशोक नाईक, वसीम कुर, माजी ग्रामपंचायत सदस्य विजय भगत, मजीद कुर, जगन्नाथ पाटील, माजी सदस्या स्नेहा रुत, प्रभाकर मोहिते, मसुरकर, पप्पू सकरे, पूजा भगत, अनिकेत भगत, सुनील अनुमाने, मुदस्सर कुर, राजेंद्र घरत, राकेश करळकर, गीतेश करळकर, शफी वाकनिस, आदेश भगत आदी ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावचे अनेक महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनदर्शिका लवकरच मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व ग्रामस्थांना घरोघरी जाऊन वाटप करण्यात येणार असल्याचे ग्रामविकास परिवर्तन आघाडीचे वसीम कुर यांनी सांगितले आहे.

## स्मिता ठाकूर यांची उपसरपंचपदी निवड

**उरण** : देशासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या धुतूम गाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी स्मिता ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी सरपंच सुचिता ठाकूर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शंकर ठाकूर, पी. जी. ठाकूर, विनोद म्हात्रे, डॉ. मनीष पाटील, मिलिंद पाडगावकर, अखलाख शिलोत्री, नारायण पाटील, राजन कडू, मनोज ठाकूर, राजेश ठाकूर, सुजित ठाकूर, नरेश ठाकूर, दिगंबर ठाकूर, तेजस पाटील, रामचंद्र पाटील, श्याम ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, प्रसाद ठाकूर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी पुढील कामासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनी हुतात्म्यांना अभिवादन केले.

## ग्रॅनाईटच्या देवघरांना पसंती

| रसायनी | प्रतिनिधी |

काही वर्षांपूर्वी घराघरांत लाकडाचे देवघर बघायला मिळायचे. घर थोडेफार साधे असल्यास सागाचे देवघर पाहायला मिळत असत. परंतु, बदलत्या काळात घराबरोबरच देवघरांच्या रुपातही बदल झालेला दिसतो. आता बहुतांश घरांमध्ये लाकडाऐवजी मार्बल अथवा ग्रॅनाईटचे देवघर पहायला मिळत आहेत. मजबूत टिकावू आणि कीड लागण्याचा धोका नसल्याने या देवघरांना पसंती दर्शवण्यात येत आहे. पर्यावरणाचा हास टाळण्यासाठी जंगल तोडीस मनाई आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीचे लाकूड उपलब्ध होत नसल्याने लाकडाची देवघरे दुर्मीळ होऊ लागली आहेत. मार्बलचे देवघर आणि त्यावरील नक्षीकाम पाहता क्षणी चित्त वेधणारे आणि उत्तम कलाकुसर केलेले असते. देवघर अगदी १००० रुपयांपासून ७००० रुपयांपर्यंत उपलब्ध असल्याचे विक्रेत्याने सांगितले. तुलनेने मार्बल, ग्रॅनाईटची मंदिरे मजबूत, साफसफाई करण्यास सोयीची आणि टिकावू असल्याने ग्राहकांकडून या देवघरांना मोठी पसंती दर्शवण्यात येत असल्याचे रसायनीतील एका देवघर विक्रेत्याने सांगितले.



हल्ली घरात अद्ययावत सोयीसुविधा, मॉड्युलर किचनवर जास्त लक्ष दिले जाते. त्याचबरोबरच देवघरही प्रसन्न, मन शांत करणारे असावे याकडे कल असतो. पांढऱ्या शुभ्र मार्बलमुळे देवघर अधिकच सुंदर दिसत असून घरातील वातावरणही प्रसन्न राहते. त्यामुळे मार्बलचे देवघर खरेदी करीत असल्याचे एका ग्राहकाने सांगितले.

---

## भात पैदास प्रकल्पामुळे अन्नसुरक्षेला बळकटी

| नेरळ | प्रतिनिधी |

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात नव्याने सुरू होणाऱ्या गतिमान भात पैदास तंत्रज्ञान प्रकल्पामुळे देशाच्या अन्नसुरक्षेसह नागरिकांच्या पोषणसुरक्षेस बळकटी मिळेल, असा विश्वास डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी येथे व्यक्त केला. संशोधन केंद्राच्या विविध प्रक्षेत्र आणि प्रयोगशाळांना भेट दिल्यावर शास्त्रज्ञांशी संवाद साधण्यात आला.

कर्जत येथील भात संशोधन केंद्रात उभारण्यात आलेल्या केंद्राचे उद्घाटन कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांचे हस्ते झाले. यावेळी स्नेहल भावे, कर्जत भात केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, सहायक भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. मीनाक्षी केळुस्कर, मृदा शास्त्रज्ञ डॉ. देवदत्त जोंधळे, कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. राजेंद्र सावळे प्रामुख्याने उपस्थित होते. या भात पैदास प्रक्रिया केंद्रात भाताच्या वाणावर वेगवगेळ्या प्रकारची अभ्यास तेथे केला जाणार आहे. भात संशोधन केंद्रासाठी हे भात प्रक्रिया केंद्र महत्वाचे ठरणार आहे.कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थेसोबतच्या प्रकल्पांचा तसेच विकासात्मक बाबींचा आढावा घेतला.

संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होण्यासाठी सर्वच प्रकल्पांना आवश्यक निधी व तांत्रिक मनुष्यबळ वेळेवर उपलब्ध करून दिले जाईल असे आश्वासन डॉ. भावे यांनी दिले. संशोधन केंद्राची मुख्य इमारत १०६ वर्षांपूर्वीची असल्याने ती 'वारसा' म्हणून जतन करण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. जीवनात वक्तशीरपणा फार महत्त्वाचा असून सर्वांनीच वेळेचे कसोशीने पालन करावे असा सल्ला त्यांनी दिला. संशोधन केंद्राचा चेहरामोहरा झपाट्याने बदलत असल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले.

## बुजगावणं करतोय पिकाचं संरक्षण

| रसायनी | प्रतिनिधी |

शेतामध्ये कडधान्य पेरल्यावर शेतकऱ्याला जंगलातील रानटी प्राण्यांची भीती असते, शिवाय पक्षीही शेतामध्ये पेरलेल्या कडधान्याची नासधूस करीत असतात. पूर्वीपासून शेताचे संरक्षण करण्यासाठी बुजगावणे शेतात उभे केल्यामुळे कडधान्य पिकांचे नुकसान टळले जाते. सातत्याने पिकांचे रक्षण करणे हे शेतकऱ्याला शक्य नसते. तसेच शेतामध्ये पेरलेल्या कडधान्याने बहरल्याने त्यांच्या सुवासाने, रानटी पक्षी, प्राणी मोकाट गुरे शेतात प्रवेश करतात. त्यामुळे शेतकऱ्याला मोठे नुकसान सहन करावे लागते. ते होऊ नये म्हणून शेतकरी शेतात बुजगावणे उभे करून पिकांची होणारी नासधूस थांबवित आहेत. बुजगावणे माणसाप्रमाणे दिसत असल्याने शेतात रानटी पक्षी, प्राणी मोकाट गुरे प्रवेश करत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याला या बुजगावण्यापासून मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. शेतकरी शेतामध्ये वाल, मूग, हरभरे, मटकी, मका, भाजीपालाही पिकवत आहेत. बुजगावणे या पिकांचे संरक्षण करीत आहेत.

---

## फार्म हाऊस-रिसॉर्ट मालकांना मार्गदर्शन

| पनवेल | प्रतिनिधी |

३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने पनवेल तालुका पोलीसांच्या मार्फत हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालक यांना महत्वाच्या सूचना अनुषंगाने बैठक घेऊन देण्यात आल्या. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालकांची बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी सूचना करताना सांगितले की, सीसीटीव्ही कॅमेरे अद्यावत करणे, अमली पदार्थ वापर होणार नाही याची दक्षता घेणे, स्पीकर परवानगी घेणे व विहित वेळेत स्पीकर बंद करणे, फार्म हाऊस रिसॉर्ट येथे क्षमता असेल तेवढीच बुकिंग करणे, फायर वाटला ठेवणे, फार्म-हाऊस रिसॉर्टमध्ये काम करणारे कामगारांचे व्हेरिफिकेशन करून घेणे, सेक्युरिटी गार्ड नेमणे, स्विमिंग पूल असल्यास तेथे प्रशिक्षित व्यक्तींची नेमणूक करणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही आदी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

## पनवेलच्या बाजारपेठा नाताळनिमित्त सजल्या

| पनवेल | प्रतिनिधी |

नाताळ हा सर्ण सर्व जाती-धर्मातील नागरिकांकडून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. विशेषकरून बच्चे कंपनीमध्ये या सणाचे विशेष आकर्षण असते. अवघ्या काही दिवसांवर नाताळ येऊन ठेपला असल्याने पनवेल परिसरातील विविध ठिकाणच्या बाजारपेठा सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. ख्रिसमसनिमित्त होणाऱ्या सेलीब्रेशनची जय्यत तयारी सुरु झाल्याचे दिसत आहे.



शहरांतील बाजारपेठा, दुकाने व मॉल्स ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी लाईट्स, बेल्स, स्टार्स, सांताच्या टोप्या, केक, सजावटीच्या वस्तू आदी साहित्यांनी सजल्या आहेत. यानिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे. सध्यास्थितीत बाजारपेठेत सजावटीच्या वस्तूंमध्ये विविध आकारांचे ख्रिसमस ट्री, जिंगल बेल्स, लाईट्स, स्टार्स, टिनसेल, बॉल्स, ख्रिस्त जन्माचे साहित्य, मुखवटे आणि सांताक्लॉजच्या टोप्या दाखल झाल्या आहेत. तसेच खाद्यपदार्थांमध्ये विविध फ्लेवर्सचे केक, विशेषतः प्लम केकचीमागणी जास्त असते. विशेषकरून लहान मुलांसाठी बाजारात सांताक्लॉजसारखे ड्रेस, कानटोपी, ग्लोज, शूज, पोतडी बॅग्जही आल्या आहेत. बच्चे कंपनीत सांताक्लॉजचे खास आकर्षण असल्याने चॉकलेट गिफ्ट घेवून येणाऱ्या सांताक्लॉजचे आकर्षक मुखवटे, टोपी यांची खरेदी आतापासून होतांना दिसत आहे. काही ठिकाणी साहित्याच्या किमतीत वाढ झाली आहे, तरीही उत्साहामुळे खरेदी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

---

**८१ एकर जमीन येणार ओलिताखाली** | **१६० ग्रामस्थांचा उपक्रमात सहभाग**

# जलसंजीवनीतर्फे पाथरजमध्ये बंधाऱ्यांची निर्मिती

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात मुंबई येथील युनायटेड वे या संस्थेकडून आदिवासी आणि ग्रामीण भागात जलसंजीवनी प्रकल्प राबविला जात आहे. या उपक्रमांअंतर्गत क्रिसिल फाऊंडेशनच्या मदतीने चार ठिकाणी नदी नाले यांच्यात सिमेंट बंधारे बांधण्यात आले आहे. या सर्व बंधाऱ्यांची लोकार्पण सोहळा युनाट्यटेड वे कडून करण्यात आला. पाणी साठवण करण्याच्या दृष्टीने तीन जलसंचरण बंधारे आणि एक कोरवाल बंधारा असे चार बंधारे बांधले असून त्या बंधाऱ्यांमध्ये साठलेल्या पाण्याचा फायदा ८१ एकर जमीन ओलिताखाली आणण्यासाठी मदत होईल असा अंदाज आहे.



युनायटेड वे मुंबई संस्था कार्यान्वयित आणि क्रिसिल फाऊंडेशनच्या अर्थसहाय्याने जलसंजीवनी प्रकल्प अंतर्गत एकूण चार जल संरचना (बंधारे) ज्यात तीन स्टॉप डॅम आणि एक कोरवाल बांधण्यात आले आहेत. एकूण ८१ एकर क्षेत्र लागवडीखाली येणार आहे. त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एकता जल उपयोगिता समूह स्थापित करण्यात आला आहे. सदर जल संरचनेचा हस्तांतरण कार्यक्रम पाथरज ग्रामपंचायत येथील डोंगरपाडा गावात असंख्य शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झाला. क्रिसिल संस्थेचे प्रतिनिधी ज्योती कंदन, मनी कंदन, युनायटेड वे मुंबई संस्थेचे अजय गोवले, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेश मेचकर, समीर करटूले, आश्रम शाळेचे मुख्याध्यापक बनसोडे विविध बचत गटाच्या महिला, शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी पाथरजचे नामदेव वारघडे यांच्याकडे जल संरचना हस्तांतरण पत्रक सुपूर्द करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांनी बंधारा बांधण्यासाठी आपल्या जमिनीची जागा दिली आणि सहकार्य केले त्यांचा गौरव करण्यात आला.

### पाणी पातळी वाढणार

बंधाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. रब्बी पिके तसेच भूजल पातळीत मोठी वाढ होत आहे. अनुक्रमे भूजल पातळीतील वाढ पाणीटंचाईच्या काही दिवसांसाठी मात करणारी आहे.

युनायटेड वे मुंबई, जल संजीवनी प्रकल्पाचे मंगेश बोपचे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. सदर कार्यक्रमात लाभार्थी शेतकरी अतुल लोहकरे, समीर करटूले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. क्रिसिल फाऊंडेशनच्या ज्योती यांनी युनायटेड वे संस्थेचे कौतुक केले तसेच सहकार्य केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. युनायटेड वे मुंबई संस्थेचे प्रतिनिधी विवेक कोळी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमा प्रसंगी एकूण १६० ग्रामस्थांनी उपक्रमात सहभाग घेतला आहे. उभारण्यात आलेल्या चार बंधाऱ्यांमुळे उन्हाळ्यात वेगवेगळी पिके घेणारी शेती शेतकऱ्यांना करता येणार असल्याने जनसंजीवनी प्रकल्पाचे कौतुक होत आहे.

---

# निवडक

## बिबट्याच्या हल्ल्यात बैलाचा मृत्यू

**कोलाड** : रोहा तालुक्यातील ऐनवहाळ हद्दीत मंगळवार (दि.२३) डिसेंबर रोजी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने एका बैलावर हल्ला केला. या हल्ल्यात बैलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून या घटनेमुळे या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रोहा तालुक्यातील ऐनवहाल, डोळवहाल, रेवेचीवाडी तसेच चिंचवलीतर्फे अतोणे परिसरातील असंख्य गावे घनदाट जंगल भागात वसलेली आहेत. या परिसरात बिबट्याने दशहद निर्माण केल्यामुळे येथील जागृत नागरिकांनी वन विभाग, पोलिस अधिकारी, तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांच्याशी संपर्क साधला आहे. त्यामुळे तिन्ही पथक घटना स्थळी दाखल झाले आहेत. त्यांनी बिबट्याची शोध मोहीम सुरु केली असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले आहे. या परिसरात बिबट्याने ऐनवहाल येथील पोलीस पाटील प्रकाश शांताराम मोरे यांच्या घरच्या गाईचा अंदाजे ३० हजार रुपये किंमतीचा खिल्लार बैल याचा बळी घेतला आहे. यामुळे या मार्गावरून शाळेत जाणारे विद्यार्थी, कामगार, तसेच शेतावर जाणारे शेतकरी, तसेच मॉर्निंग वॉकला जाणारे ज्येष्ठ नागरिक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## दत्तात्रेय मेथा यांचे निधन

**माणगाव** : शहरातील जे. बी. डी. प्लाझा येथील रहिवाशी उद्योजक प्रितेश मेथा यांचे वडील दत्तात्रेय बाळकृष्ण मेथा यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी बुधवार (दि.१७) डिसेंबर रोजी निधन झाले.



त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे. दत्तात्रेय मेथा हे प्रेमळ स्वभावाचे, शांत, मनमिळावू व्यक्तिमत्व होते. त्यांचा जाण्याने मेथा परिवार व नातेवाईकावर शोककळा पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी (दि.२६) डिसेंबर रोजी व उत्तरकार्य (दि.२८) डिसेंबर रोजी श्रीमती सरलादेवी मंगल कार्यालय माणगाव येथे होणार आहेत.

## बसमध्ये चढताना मोबाईलची चोरी

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर एनएमएमटी बसथांब्यावरून चढताना २३ वर्षीय तरुणाचा ५० हजार रुपये किमतीचा आयफोन चोरल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहित सूर्यवंशी हा नॅशनल रेजन्सी, तक्का येथे राहत असून, कॉलेजला जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात आला. मेगाब्लॉक असल्याने पनवेल-ठाणे बस पकडताना गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्याने त्याच्या खिशातील मोबाईल पळविला. त्याने तक्रार केल्यावर बस कामोठे पोलीस ठाण्यात नेण्यात आली. पोलिसांनी बसमधील प्रवाशांना तपासले असता मोबाइल सापडला नाही.

## कार देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल** : कारची बुकिंग न करता बुक केली असल्याचे सांगून तिची डिलिव्हरी लवकर देण्याकरिता सहा लाख नऊ हजार २९० रुपये घेऊन फसवणूक केल्या प्रकरणी दिप्तेश गोरे (रा. करंजाडे) विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजेंद्र नाकाडे (रा. सेक्टर १२, खारघर) यांनी ऑक्टोबरमध्ये कार बुक केली. यासाठी २१ हजार रुपये दिले, नोव्हेंबरमध्ये गाडीची डिलिव्हरी लवकर देण्यासाठी एक लाख २९ हजार रुपये रोख दिले. त्यानंतर पुन्हा ५० हजार रुपये देण्यात आले. आणखी पैसे पाठवले. गाडीची डिलिव्हरी लवकर देतो, असे सांगून ८ डिसेंबर आणि १२ डिसेंबर रोजी एक लाख ५८ हजार २९० रुपये ऑनलाइनद्वारे घेतले. पावत्या मागितल्यावर त्याने देण्यास टाळाटाळ करून फोन उचलणे बंद केले. त्यानंतर शोरूममध्ये फोन करून सदरचा प्रकार सांगितला. याबाबत मॅनेजरकडे चौकशी केली असता दिप्तेश याने घेतलेली रक्कम शोरूममध्ये जमा केलेली नसून तो पंधरा दिवसांपासून नोकरी सोडल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## डिझेल चोरी करणाऱ्यास अटक

**पनवेल** : महामार्गाच्याकडेला थांबलेल्या वाहनचालकांना चाकूचा धाक दाखवून जबरीने डिझेल चोरी करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना कळंबोली पोलिसांनी अटक केली आहे. आकाश चव्हाण (२९, रा. फेज वन, तळोजा, नवी मुंबई) आणि जितू अनिल चावला (३६, रा. नवी मुंबई) अशी या दोघांची नावे आहेत. त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा गुन्हा केला होता. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानुसार तपास पथकाने मोठ्या कुशलतेने तपास करत आकाश व जितू या दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून १७५ लिटर डिझेल, ५ लाख रुपये किमतीची कार, एक चाकू, कारसाठी वापरत असलेली बनावट नंबर प्लेट व डिझेल चोरीसाठी वापरले जाणारे साहित्य पोलिसांनी जप्त केले. चोरटे ऑनलाइन ॲपद्वारे वाहन भाडेतत्त्वावर घेऊन त्यावर बोगस नंबर प्लेट वापरून डिझेल चोरीचे गुन्हे करत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

## वैमानिक प्रशिक्षणाच्या नावे फसवणूक

**पनवेल** : वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली तरुण प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. एका संस्थेचे संचालक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली चार प्रशिक्षणार्थी मुलींकडून २ कोटी ३९ लाख रुपये उकळल्याचा आरोप पालकांनी पोलिसात केला आहे. बोरीवली येथील सेवानिवृत्त एअर इंडिया कर्मचारी हे पीडित प्रशिक्षणार्थी मुलीचे पालक आहेत. त्यांनी मुलीच्या प्रशिक्षणासाठी ५४ लाख रुपये या संस्थेत भरले होते. सप्टेंबर २०२४ पासून खारघर येथील कार्यालयातून प्रशिक्षणाचे कामकाज सुरू होते. मुलींना दुबईमधील एका संस्थेत पाठवण्यात आले. मात्र पूर्ण शुल्क न भरल्याने प्रशिक्षण थांबविल्याने प्रशिक्षणार्थींना भारतात परतावे लागले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जिल्ह्यात पथनाट्यातून एड्स जनजागृती



। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई येथील प्रकल्प संचालक तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात एड्स जनजागृतीसाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील एकूण १५ ठिकाणी दोन कलापथकांच्या माध्यमातून २४ ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत एड्स विषयक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

शाहीर पांडुरंग हनुमंत गवळी व सहकारी, सांगली यांच्या माध्यमातून पोलादपूर (शिवाजी चौक), महाड (बाजारपेठ), माणगांव (एस.टी. स्टॅन्ड), म्हसळा (प्राथमिक आरोग्य केंद्र), श्रीवर्धन (एस.टी. स्टॅन्ड), मुरुड-जंजिरा (समुद्रकिनारा) व रोहा (एस.टी. स्टॅन्ड) येथे पथनाट्ये सादर करण्यात येणार आहेत. तर शाहीर आलम रमजान पाटवेगार, सांगली यांच्या माध्यमातून अलिबाग (आंबेडकर चौक), पेण (एस.टी. स्टॅन्ड), खोपोली (शिळफाटा), पाली-सुधागड (प्राथमिक आरोग्य केंद्र), पनवेल (एस.टी. स्टॅन्ड), उरण (एस.टी. स्टॅन्ड), कशेळे (ग्रामीण रुग्णालय) व कर्जत (रेल्वे स्टेशन) येथे कार्यक्रम होणार आहेत.

यावेळी एचआयव्ही संसर्ग होण्याचे चार प्रमुख मार्ग स्पष्ट करण्यात आले. त्यामध्ये असुरक्षित लैंगिक संबंध, एचआयव्ही संसर्गित व्यक्तीचीच सुई व सिरिंजचा वापर, संसर्गित रक्त देण्यात आल्यास तसेच एचआयव्ही बाधित पालकांकडून होणाऱ्या बाळाला संसर्ग होण्याची शक्यता यांचा समावेश आहे. प्रत्येक नागरिकांनी व विशेषतः गरोदर मातांनी शासकीय दवाखान्यातील आयसीटीसी समुपदेशन व तपासणी केंद्रातून एचआयव्हीची तपासणी करून घ्यावी, नेहमी नवीन सुईचा वापर करावा, रक्ताची गरज भासल्यास प्रमाणित रक्तपेढीतूनच रक्त घ्यावे तसेच एचआयव्ही संसर्ग आढळल्यास मोफत उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

माझे आशील श्री. कमलाकर मधुकर पाटील, मु.तळाशेत-खरोशी, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

मौजे तळाशेत, ता.अलिबाग, जि.रायगड गट नं.१४१, क्षेत्र ३.५४.७० हे. आर., आकार रू.२७.५४ पैसे (जुना सर्व्हे नं.१०३/१, सर्व्हे नं. १०४/२, सर्व्हे नं. १०५/१ व सर्व्हे नं. १०६/१अ) या मिळकती माझे आशील यांचे खुद्द कब्जे वहीवाटीच्या व मालकी हक्काच्या आहेत. सदरहु मिळकतीशी श्रीमती धानिबाई मधुकर पाटील, श्री. सतिष मधुकर पाटील, श्री.राजेंद्र मधुकर पाटील, मु.तळाशेत खरोशी, ता.अलिबाग श्रीमती सुनंदा प्रभाकर पाटील, मु. धेरंड, ता.अलिबाग व श्रीमती अंजनी रमेश पाटील, मु.बांधण, ता.अलिबाग यांचा कोणताही हक्क हितसंबंध, कब्जा व अधिकार नाही. सदर मिळकती बाबत सदर व्यक्तींनी मा.दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे अर्ज क्र. १/२०२२ दाखल केला असुन त्याचे काम प्रलंबित आहे. मात्र, सदर व्यक्ती हे बेकायदेशीरपणे संदर्भीत मिळकत त्रयस्त व्यक्तींचे लाभात हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की, श्रीमती धानिबाई मधुकर पाटील, श्री. सतिष मधुकर पाटील, श्री. राजेंद्र मधुकर पाटील, श्रीमती सुनंदा प्रभाकर पाटील व श्रीमती अंजनी रमेश पाटील यांचेशी संदर्भात मिळकती बाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणीही बेकायदेशीरपणे अशा प्रकारे व्यवहार केल्यास तो माझे आशील यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख २४.१२.२०२५

सही/-
**ॲड.एस.वाय.बारटके**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/25-26/ Rfx No.7000038475 | Scheme for SITC of 1 No. of 22kV Bay for MSEDCL at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane… 4th call | Rs. 20,22,308.83/- | 04.01.2026 up to 23:59 hrs |

**EMD 1 % of estimate Cost i.e. 20,223.08/-, Tender fee** : Rs. 500/- + GST.
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

## अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि. रायगड
### जाहिर निविदा सन २०२५-२६

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे संगणक विभागा कडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत आस्थापना/व्यावसायिक करीता जाहीर निविदा दरपत्रक मागविणेत येत आहे.

टिपः- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती व निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील संगणक विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : २६/१२/२०२५

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि. रायगड**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः विभागीय अभियंता (विद्युत)
### मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार [ पश्चिम ] : मुंबई-400 086

**Email. deelectmbi@gmail.com** **Phone ०२२-२५१३६३०३**
क्र.राप / काअमुं / विअ(विद्युत) / ई निविदा / १०४० दिनांकः २४/१२/२०२५

**ई– निविदा सुचना क्रमांक ११ सन २०२५-२६ (विद्युत)**

विभागीय अभियंता (विद्युत), रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई– ८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई–निविदेकरीता मोहरबंद निविदा मागवित आहेत.

| ई क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १२६२८७५_१ | रा.प. रायगड विभागातील नव्याने बांधलेल्या रामवाडी पेण आगाराचे विद्युतीकरण करणे. | ३२८०४५९.०० |

**ई–निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | २४/१२/२०२५ | १७.०० |
| 2 | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | ३१/१२/२०२५ | १७.०० |
| 3 | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | ०१/०१/२०२६ | १७.०० |

**टीपः– १.** सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in** वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
**२.** इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील सदर कामांची एक अथवा सर्व ई– निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता (विद्युत)**
**रा.प.मुंबई**

## सार्वजनिक खबरदारी सूचना (नोटीस)

माझे अशिल श्री. राजाराम एकनाथ पाटील व इतर १३, सर्व रा. दादर, ता. पेण, जि. रायगड यांनी दिलेले माहितीवरुन, दाखविलेले कागदपत्रांवरुन व सांगितलेनुसार, सर्व तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की-

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./गट नं. | क्षेत्र(हे.आर) | पो.ख. (हे. आर) | आकार (रु.-पैसे) |
|---|---|---|---|---|
| मौजे दादर, ता. पेण. | २३३/१/क | ०-३७-५ | ०-०५-५ | १-०० |
| | | मिळूण एकुण क्षेत्र ०-४३-०० | | |

वरील स्थावर मालमत्तेचे गा.न.नं. ७/१२ चे उताऱ्याला सद्यस्थितीत यशवंत हासुराम घासे यांचे नावाची नोंद मौजे दादर फेरफार नंबर ५०५० अ अन्वये दाखल आहे. सदरील नोंदीबाबतचा वाद मा. अप्पर जिल्हाधिकारी सो., रायगड-अलिबाग यांचे कोर्टात अपील क्र. ३४८/२०२५ कडे न्यायप्रविष्ठ व प्रलंबीत असून, सदरचा वाद चालू असलेले न्यायालयीन कार्यवाहीच्या निकालाच्या अधीन आहे. सदरचे वादातील पक्षकार यशवंत हासुराम घासे हे वादातील मालमत्ता त्यांचे नावे नोंदीस असल्याचा गैरफायदा घेऊन विक्री करुन हस्तांतरण करु पाहत आहेत, असे आमचे अशिलांना खात्रीलायक समजले आहे. तरी सदर जमीन मिळकत खरेदी करणे, विकणे किंवा हस्तांतरित करणे, किंवा मालमत्तेवर बोजा अगर गहाण ठेवणे, मालमत्तेवर बांधकाम करुन बदल करणे, असे व इतर कोणत्याही प्रकारचे कसलेही व्यवहार कोणीही करु नये, असे माझे अशिल तमाम जनतेस याद्वारे सूचित करीत आहेत, तरी सदरील सूचनेचे उल्लंघन करुन यशवंत हासुराम घासे यांचेसोबत कोणीही कसलेही स्वरुपाचा व्यवहार केल्यास, सदरील केलेला कोणताही व्यवहार हा अवैध व बेकायदेशीर असेल व तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे सूचित/जाहीर केले असे.

पेण.
दिनांक : २४/१२/२०२५

सही/-
**ॲड. सरिता प्रविण माळी**
पत्ता : फ्लॅट नंबर २०१/०९ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स,
ए विंग, दुसरा मजला, वीर सावरकर मार्ग, गोविंद बाग,
कौंडाळतळे, मु.पो. ता. पेण, जिल्हा रायगड.-४०२ १०७
भ्रमणध्वनी क्र. : ८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिलीप कुंडलिक कडवे आणि श्रीमती. मंदा श्रीधर मढवी यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| मिळकतखार, अलिबाग | ७ | ०-२०-५० | २.३० |

तसेच वर नमुद मिळकत आणि सदर मिळकतीवर बांधण्यात आलेले लांबी २५ मीटर X रुंदी १० मीटर X उंची ९ मीटर क्षेत्र ०.०२.५, ३ असे शेतघर या नोटिशीचा विषय आहे

अलिबाग,
दिनांक- २५/१२/२०२५

सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय-रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक मालिनी मनसुखानी लाड यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. विद्यमान मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व त्या विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ठ**
**ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| आगरसुरे | ४२/१ | ०-१८-९० पो.ख.०-००-८० एकूण ०-१९-७० | ४.५० |
| आगरसुरे | ४२/२ | ०-१४-७० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१५-७० | ३.४५ |

तसेच त्या मिळकतींमध्ये जाण्या-येण्याकरीता मौजे आगरसुरे गट नं.४१/१ या मिळकतीमधुन १०५ फूट लांबीच्या व १५ फूट रूंदीच्या (एकूण क्षेत्र ० हे.१.६० आर.) रस्त्याच्या निरंतर वहिवाटीच्या हक्कासह.

अलिबाग
तारीख : २५/१२/२०२५

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील.
अे/१,२, तळमजला,
'श्रृतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## ग्रुप ग्रामपंचायत होडगाव
### ता. माणगाव जि. रायगड

**जाहीर निविदा** नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि २२/१२/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत होडगाव ता.माणगांव जि.रायगड यांज कडून खालील कामा करिता जास्त नोंदणीकृत, इच्छ ठेकेदाराकडून व साहित्य पुरवठादार लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि ३०/१२/२०२५ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय होडगाव येथे सकाळी ११:०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नांव/साहित्याचे नाव | योजेनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी शाळांना पाणी सुविधा करणे (हॅण्ड वाश स्टेशन) | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिना | प्रति नग |
| २ | मागासवर्गीय वस्तीत कचराकुंड्या पुरविणे (२०२२-२३) | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिना | प्रति नग |
| ३ | होडगाव नळ पाणी पुरवठा योजना दुरूस्ती सौलर बसविणे (२०२२-२३) | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिना | प्रति नग |
| ४ | अंगणवाडी केंद्रांना सौलर बसविणे (२०२३-२४) | १५ वा वित्त आयोग | १२०००० | १ महिना | प्रति नग |
| ५ | सार्वजनिक शौचालय बांधणे (२०२३-२४) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिना | प्रति नग |
| ६ | महिलांकरीता आरोग्य शिबिर (२०२३-२४) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | १ महिना | |
| ७ | सार्वजनिक कचरा कुंड्या | १५ वा वित्त आयोग | ७०९४९ | १ महिना | गरजेनुसार |
| ८ | ग्रामपंचायत कार्यालय फिल्टर बसविणे | १५ वा वित्त आयोग | ६०००० | १ महिना | प्रति नग |
| ९ | शाळांना फर्निचर व इतर आवश्यक साहित्य पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ६०१३९ | १ महिना | प्रति नग |
| १० | होडगाव आदिवासीवाडी शाळा डिजीटल करणे एलइडी टीव्ही | १५ वा वित्त आयोग | २९००० | १ महिना | प्रति नग |
| ११ | अंगणवाडी विद्यार्थी गणवेश पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ६७६५६ | १ महिना | प्रति नग |
| १२ | मागासवर्गीय वस्तीत स्वच्छता विषयक साहित्य पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ९५८४५ | १ महिना | प्रति नग |
| १३ | अंगणवाडी विद्यार्थी गरोदर माता पोषण आहार पुरविणे | १५ वा वित्त आयोग | ७०६२२ | १ महिना | गरजेनुसार |

**अटी व शर्तीः**
१. प्राप्त निविदा दि. ३०/१२/२०२५ रोजी दु. ११.०० वाजता ग्रा. प. होडगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२. निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी
३. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४. कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील
५. निविदा मंजूरी अंती ठेकेदार/पुरवठादार यांस रितसर करारनामा करून घावा लागेल.
६ कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहीत केलेल्या मुदतीचे काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येईल.
७. साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८. निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
९. नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१०. ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व प्रणालीशी संलग्न असावे.
११. कायद्याचा देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता.माणगांव जि.रायगड**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक ममता दिलीप राऊत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | ५९४/१ | ०-२७-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२८-०० | १३.१० |

वर नमुद बागायत जमिन मिळकतीमधील खाते क्र. ४९६६ ममता दिलीप राऊत यांच्या मालकीचे क्षेत्र ०-०६-०० हे. आर., आकार २.९१ रु. पैसे हि बागायत मिळकतीबाबतचे

दिनांक : २४/१२/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि.रायगड खालील वर्णन केलेल्या बागायत/बिनशेती व घर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गणेश यशवंत कुर्वे, श्री.बाळकृष्ण यशवंत कुर्वे व श्री. मनोहर यशवंत कुर्वे सर्व रा.बी-३/९०२, विकास कॉम्प्लेक्स, ऑट एल.बी.एस.रोड, कॅसल मिल कंपाऊंड, ठाणे-पश्चिम यांच्या नांवे असलेली बागायत/बिनशेती व घर मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करारनामा विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १. चौल ता.अलिबाग | ६२ (बागायत मिळकत) | ०-१२-६० पो.ख.०-०१-९० एकूण ०-१४-५० | ७.७८ |

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| २ चौल ता.अलिबाग | ६१ | ५-००-०० | ५०.०० |

ही संपूर्ण बिनशेती मिळकत व या मिळकतीमध्ये असलेले ग्रुप ग्रामपंचायत चौल घर क्र.५६३ व ५६३ ब यासह

सबब सदरहू बागायत/बिनशेती व घर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २३/१२/२०२५

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे टाकवे, ताः कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. टाकवे, ताः कर्जत जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं. | हिस्सा नं | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार रू पै |
|---|---|---|---|---|
| विमल रामचंद्र ढाकवळ | ६३ | ३/अ | ०-५८-७० | ५-४४ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २५/१२/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत जि.रायगड
मो.नं. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अरूणा नानाभाऊ गोपाळे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे-तांबस तालुका-कर्जत जिल्हा-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं.व उपविभाग /सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| अरूणा नानाभाऊ गोपाळे | ३७/६ | १-६३-६० पैकी लिहून देणार यांचे हिस्साचे क्षेत्र ०-८३-६० पैकी विकत देणेचे क्षेत्र ०-२०-० | ८-९८ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणा-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. २५/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड निलेश कान्हू मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - शॉप नं २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग
प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. ओंमकार किशोर हांडे २) श्री. स्वप्नील रामदास मते यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार(रू.पै) |
|---|---|---|---|
| ४० | ४ | ०-४३-०० | ०-३७ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांकः २५/१२/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे रांजणखार, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| रांजणखार | २१ | ०-१२-९० पो.ख. ०-००-७० ०-१३-६० | १.४० | १) श्री.माणिक चंद्रकांत म्हात्रे, २) श्रीम.विषया चंद्रकांत म्हात्रे, ३) श्रीम.विजया चंद्रकांत म्हात्रे, |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २५/१२/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

नि. ८/ड

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात.
दिवाणी चौकशी अर्ज नं. १९७/२०२५

श्री. संजय दत्तात्रेय साळुंके वगैरे ३ — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांना जाहिर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, श्री. संजय दत्तात्रेय साळुंके वगैरे ३ यांनी कै. सुलोचना दत्तात्रेय साळुंके यांचे वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदारांव्यतिरिक्त कै. सुलोचना दत्तात्रेय साळुंके यांना अन्य कोणीही वारस नाही असे अर्जदार यांचे कथन आहे.


अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. सुलोचना दत्तात्रेय साळुंके यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयात दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकारी व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक १६/०१/२०२६ रोजी जाहीर नोटीसला अनुसरून अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला जारी करणेची पुढील कारवाई करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.
आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.
दि.२३.१२.२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

सही/-
सहा अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अलिबाग

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## प्रवीण आमरे, रोझ मर्क यांच्या संयुक्त विद्यमाने

# शिवतिर्थावर नव्याने क्रिकेटपटू घडणार

। विनायक दळवी ।
। मुंबई ।

सचिन तेंडूलकर, अजित वाडेकर, विजय मांजरेकर, सुभाष गुप्ते, श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर यांसारखे क्रिकेटपटू मुंबईच्या क्रिकेट पंढरीत म्हणजेच शिवतीर्थावर घडले आहेत. त्यामुळे त्यांच्याप्रमाणेच मुंबईतील शिवाजी पार्क जिमखान्यावर नव्याने क्रिकेटपटू तयार करण्याची संकल्पना भारताचे माजी कसोटीपटू व सुप्रसिद्ध प्रशिक्षक प्रवीण अमरे यांनी सोमवारी (दि.२२) पत्रकारांसमोर मांडली. यावेळी शिवाजी पार्क जिमखाना आणि रोझ मर्क क्रिकेट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तीन वेगवेगळ्या वयोगटातील गुणवत्तावान क्रिकेटपटूंना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी प्रशिक्षक यांच्याद्वारे विनामूल्य प्रशिक्षण देण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे.

### ■ विनामूल्य प्रशिक्षण देण्याची योजना

हा बारकोड स्कॅन करून खेळाडूंनी निवड प्रक्रियेचे फॉर्म भरणे...



भारताचे माजी कसोटीपटू, सुप्रसिद्ध प्रशिक्षक तथा शिवाजी पार्क जिमखान्याचे अध्यक्ष प्रवीण अमरे यांनी सोमवारी पत्रकारांसमोर एक संकल्पना मांडली. त्यांनी सांगितले की, १२ ते १४ वर्षे, १४ ते १६ वर्षे आणि १६ ते १९ वर्षे अशा तीन वयोगटातील गुणवत्तावान खेळाडूंना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी प्रशिक्षकांद्वारे विनामूल्य प्रशिक्षण देण्याची योजना आखण्यात आली आहे. प्रत्येक वयोगटात १६ असे एकूण तीन वयोगटात ४८ क्रिकेटपटू या उच्च दर्जाच्या विनामूल्य प्रशिक्षणासाठी निवडले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, प्रवीण अमरे यांच्यासह विनय दांडेकर व सिद्धार्थ भाटकर या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना लाभणार आहे.

शिवाय या प्रशिक्षण प्रक्रियेमध्ये माजी रणजीपटू व प्रशिक्षक भरत कर्णिक हे देखील विशेष निमंत्रित म्हणून मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती शिवाजी पार्क जिमखान्याचे सचिव संजीव खानोलकर यांनी पत्रकारांना दिली. तसेच, रोझ मर्क अकॅडमीचे अध्यक्ष उदय तारदाळकर यांनी सांगितले की, भारतीय क्रिकेटच्या भवितव्यासाठी, शिवाजी पार्क जिमखाना सोबतची ही आमची गुंतवणूक सत्कारणी लागणारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिमखानाच्या प्रशिक्षकांच्या देखरेखीखाली हे लक्ष साध्य होईल, हा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर रोझ मर्कचे कार्याध्यक्ष पूर्वेश शेलटकर यांनी सांगितले की, मुंबईच्या क्रिकेटचा देदीप्यमान इतिहास आणि नवोदित गुणवत्तेला आकार देण्याची आमची परंपरा ही या योजनेमुळे प्रतिबिंबित होत आहे. म्हणूनच आम्ही एका चांगल्या उपक्रमात सहभागी झालो आहोत, असे सांगितले. ही निवड चाचणी दि.८ ते १० जानेवारी दरम्यान मुंबईतील शिवाजी पार्क जिमखाना येथे सकाळी साडेसात वाजता सुरू होणार असल्याचे जिमखाना आणि रोझ मर्क अकॅडमीच्यावतीने सांगण्यात आले आहे.

### वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन

ही निवड चाचणी तीन वयोगटातील क्रिकेटपटूंसाठी असून ८ जानेवारीला १२ ते १४ वर्षे वयोगटासाठी, ९ जानेवारीला १६ ते १९ वर्षे वयोगटासाठी व १० जानेवारी रोजी १४ ते १६ वर्षे वयोगटासाठी सकाळी साडेसात वाजता सुरू होणार आहे. यावेळी निवडीसाठी येताना, क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशात येणे आवश्यक असून सोबत आधार कार्ड किंवा जन्मतारखेच्या दाखल्यासह खेळाडूंनी थेट मुंबईतील शिवाजी पार्क जिमखाना येथे निर्धारित तारखा आणि वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी पार्क जिमखाना आणि रोझ मर्क क्रिकेट अकॅडमीच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच, ज्या खेळाडूंना ऑनलाइन निवड प्रक्रिया किंवा प्रक्रियेचे फॉर्म भरता येणे शक्य नसेल त्यांना थेट चाचणीच्या दिवशी सकाळी साडेसात वाजता शिवाजी पार्क जिमखान्यावर येऊन आपली नावे शिबिरासाठी नोंदविता येतील, असेही सांगण्यात आले आहे.

> **शिवाजी पार्क जिमखाना आणि रोझ मर्क यांची ही योजना तीन वर्षांच्या कालावधीसाठी असून, प्रत्येक वर्षी नवीन खेळाडूंना संधी मिळणार आहे. त्यातूनच श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर यांच्यासारखे भारताचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेले क्रिकेटपटू निर्माण होतील.**
> **– प्रवीण आमरे, अध्यक्ष, शिवाजी पार्क जिमखाना**

## निवडक



### विद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव

**पाली/गोमाशी :** श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे वार्षिक क्रीडा महोत्सव दि.१८ ते २० डिसेंबर रोजी संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच भगवान शिंदे व संदीप देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, हा कार्यक्रम रविकांत घोसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या मोहत्सवाचा शुभारंभ विद्यार्थ्यांनी लेझीमचे प्रात्यक्षिक सादर करत, क्रीडा ज्योत पेटवून. या क्रीडा महोत्सवात कबड्डी, कॅरम, लांब उडी, गोळा फेक, बुद्धिबळ, स्मरणशक्ती, गोफण नेमबाजी, प्रश्नमंजुषा, इंग्रजी स्पेलिंग लिहिणे, तसेच फनी गेम्समध्ये डब्बा फोडणे, संगीत खुर्ची इत्यादी खेळ व स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी मुख्याध्यापक दीपक माळी, केंद्रप्रमुख अनिल राणे, पांडुरंग डिघे, एकनाथ ओंबळे, कमळाकर शिधोरे, एकनाथ चांदे, मुख्याध्यापिका माधुरी पारखे, शिक्षक वर्ग, शाळेचे माजी कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका दिव्या जंगम तर आभार सुचिर खाडे यांनी व्यक्त केले.

### पॉवरलिफ्टिंगमध्ये रायगडचे ‘चंदेरी’ यश

**मुंबई :** इंदूर-मध्यप्रदेश येथे दि.१९ ते २१ डिसेंबर या कालावधीत पश्चिम भारत विभागीय क्लासिक राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन स्पर्धा पार पडली. यामध्ये महाराष्ट्राच्या संघातून रायगडचे ३ खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये सब ज्युनिअर, ज्युनिअर आणि सिनिअर स्पर्धा झाली. यावेळी ज्युनिअर मुलींमध्ये ४३ किलो वजनी गटात अलिबाग



तालुक्यातील वाडगांव येथील सार्वजनिक व्यायाम शाळेची सुहानी गावडे हिने १६७.५ किलो वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात रौप्यपदक पटकावले. ४७ किलो वजनी गटात खोपोली पॉवर हाऊस क्लबची तथा रायगडची आंतरराष्ट्रीय खेळाडू अमृता भगत हिने ३०५ किलो वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट यामध्ये रौप्यपदक जिंकले. तर, मुलांच्या ८३ किलो वजनी गटात पेणच्या संसारे फिटनेसच्या अथर्व लोधी याने देखील ६४२.५ किलो वजन स्कॉट बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात रौप्यपदक पटकावले.

### दिघेवाडीत रंगणार महिला कबड्डीचा थरार

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशीतील दिघेवाडी येथे प्रथमताच जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.२७) करण्यात आले आहे. दिघेवाडी या गावाला कबड्डी या खेळाचा कोणताच प्रकारचा वारसा नसताना अलीकडे या गावातील



महिलांनी शिक्षक संजय थळे यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी खेळायला सुरुवात केली. त्यामुळे कमी कालावधीत हा संघ तयार झाला. या गावातील ग्रामस्थांनी खूप मोठ्या प्रमाणावर मेहनत घेऊन कबड्डी स्पर्धेचे दिमाखदार नियोजन केले आहे. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकासाठी ११,००१ रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांकासाठी ७,००१ रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक, तसेच तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी ५,००१ रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वोत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पक्कड व पब्लिक हिरो यांनाही आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

## कर्नाटक संघा महापराक्रम

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

विजय हजारे चषकाच्या पहिल्या दिवशी चाहत्यांनी एक शानदार सामना पाहिला. परंतु, अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर कर्नाटकने झारखंडविरुद्ध चमत्कारच केला. हा एक उच्च धावसंख्या असणारा सामना होता. यावेळी इशान किशनच्या नेतृत्वाखालील झारखंडने मोठी धावसंख्या उभारूनही त्यांना पराभव पत्करावा लागला. या सामन्यात कर्नाटकच्या देवदत्त पडिक्कलने सामना जिंकणारी खेळी केली. तत्पुर्वी कर्नाटकने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी केली. झारखंडने प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ४१२ धावा केल्या. त्यामुळे विजय हजारे चषकाच्या इतिहासातील हा सर्वाधिक धावांचा पाठलाग होता. मात्र, कर्नाटकने हे लक्ष्य ४७.३ षटकांत फक्त ५ गडी गमावून पूर्ण केले.

## रायगडच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत ओकिनावा शोरीन रियु कराटे डो व उडेन टी कोबुजूत्सु असोसिएशन रायगडच्या कराटेपटूंनी २ सुवर्ण, ४ रजत व ७ कांस्यपदके मिळवून चमकदार कामगिरी केली आहे.

ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आणि महाराष्ट्र अम्यॅचुअर स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील दादर येथे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात राज्यभरातील कराटे संघटनांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील रसायनी व मजगाव-नांदगाव येथील शोरीन रियु कराटे डोच्या कराटेपटूंनी एकूण १३ पदकांची कमाई केली आहे. त्यात शर्वरी तांबडकर व वैदेही कुलकर्णी यांनी सुवर्णपदक पटकाले आहे. तसेच शांभवी सावंत, आरंभ गणतांडेल, त्रिशा गट्टू व खूशी शेट्ये यांनी रजतपदक पटकावले. तर, ईश्वरी तांबडकर, स्वरूप जांभळे, अंश गहिरे, काव्या नाक्ती, आर्यन गद्रे, जय ठाकूर व अब्दुल कापसे हे कांस्यपदकाचे मानकरी ठरले आहेत. या सर्वांना आंतरराष्ट्रीय पंच विजय तांबडकर यांच्या अध्यक्षतेखाली अभिषेक तांबडकर, आकांक्षा तांबडकर व स्वप्ना तांबडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## द्रोणागिरी स्पोर्ट्स असो.चा रौप्य महोत्सव

। पनवेल । प्रतिनिधी ।



द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या रौप्य महोत्सवाचा उद्घाटन सोहळा बोकडविरा येथील नवी मुंबई सेझ मैदानावर यावेळी क्रीडापटूंनी क्रीडाज्योत द्रोणागिरी देवी करंजा येथून प्रवीण घरत, राम, सरोज कदम, प्रियांशी पाटील, भरत म्हात्रे आणि त्यांच्या साथीदारांनी नवी मुंबई सेज मैदानात आणली. त्यानंतर त्या मैदानात एक फेरी मारून त्या ज्योतीने असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांनी मैदानातील ज्योत प्रज्वलीत केली. त्यानंरत या कामगार नेते तथा या कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी झेंडा फडकवला. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थांनी लेझिम, कवायत आणि आगरी कोळी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर सर्व खेळाडूंना क्रीडाशपथ देण्यात आली.

यावेळी महेंद्र घरत म्हणाले की, द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन २५ वर्ष दिमाखात चालू आहे. त्याचे श्रेय महादेव घरत आणि त्यांच्या सोबत असलेल्या द्रोणागिरी स्पोर्ट्सच्या सदस्यांना जाते. द्रोणागिरी स्पोर्ट्समुळे रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना व्यासपीठ मिळाले असून द्रोणागिरी भूषण पुरस्काराने काम करणाऱ्यांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा, ऊर्जा मिळते असे सांगून द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनसाठी यावर्षी आणि दरवर्षी १ लाख रुपये देणगी देण्याची घोषणा त्यांनी केली.

यावेळी संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख मिलिंद खारपाटील, उपाध्यक्ष मनोज पडते, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पायदळाचे प्रमुख पिलाजी गोळे यांचे वंशज मनोहर गोळे, पुंडलिक म्हात्रे, संदीप पाटील, फिरोज शेख, मधु निमकर, सरिता खेरवासिया, शुभांगिनी पाटील, प्रज्ञा म्हात्रे, वैशाली घरत, भक्ती घरत आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थाना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## सातारा संघाचा हिंगोलीवर विजय

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।



महाराष्ट्र क्रिकेट असो. च्यावतीने १९ वर्षांखालील मुलांच्या निमंत्रित आंतरजिल्हा दोनदिवसीय कसोटी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदानावर खेळवल्या गेल्या. त्यातील खेळवल्या गेलेल्या सातारा जिल्हा क्रिकेट असो. विरुद्ध हिंगोली जिल्हा क्रिकेट असो. या संघांमधील सामन्यात सातारा संघाने दणदणीत विजय मिळवला आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सातारा संघाने पहिल्या डावात सर्व बाद ३०९ धावा फलकावर नोंदवल्या. त्यामध्ये शादाब मुजावर याने सर्वाधिक ७५ धावा केल्या. तर, ईशान जोशीने ५३ तर सृजन बिचुकले याने ५१ धावा केला. यावेळी हिंगोली संघाकडून ओंकार मोगल याने ४ गडी बाद केले. त्यानंतर हिंगोली संघाने पहिल्या डावात सर्वबाद ११८ धावा केल्या. यावेळी सातारा संघाकडून ईशान जोशी व श्रावण खाडे याने प्रत्येकी ४ फलंदाज बाद केले. त्यानंतर दुसऱ्या डावात सातारा संघाने ४ गडी बाद १४५ धावसंखेवर डाव घोषित केला. त्यामध्ये आदिनाथ पाटील याने ५२, तर सृजन बिचुकले याने ४२ धावांची खेळी केली. हिंगोलीच्या संघाकडून सम्यक बागुल याने ३ फलंदाजांना बाद केले. यावेळी चौथ्या डावात हिंगोलीच्या संघाला जिंकण्यासाठी ३३६ धावांचे लक्ष ठेवले होते. मात्र, हिंगोलीचा डाव साताऱ्याच्या भेदक गोलंदाजींपुढे अवघ्या १४० धावसंखेवर गडगडला. यावेळी सातारा संघाकडून शादाब मुजावर याने सर्वाधिक ५, तर अनिमेश घोरपडे याने ३ फलंदाज बाद केले. त्यामुळे सातारा संघाने हा सामना १९६ धावांनी जिंकत दणदणीत विजय मिळवला. संघाचे प्रशिक्षक हेमंत गुजर यांनी विजयाचे सर्व श्रेय खेळाडूंनी मैदानावर घेतलेल्या मेहनतीला दिले आहे.

## राजिपने जिंकले फ्रेंडशिप चषक

। रसायनी । प्रतिनिधी ।



रायगड जिल्हा परिषद यांनी टाटा स्टील फ्रेंडशिप चषक क्रिकेट टूर्नामेंट जिंकताना रायगड पोलीस अधीक्षक संघाला हरविले आहे. खालापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी रायगड संघाचे नेतृत्व केले.

खालापूर तालुक्यातील टाटा स्टील कंपनीने शासकीय अधिकारी, कर्मचारी व पोलीस यांच्यासाठी टाटा स्टील फ्रेंडशिप क्रिकेट चषक या स्पर्धेचे आयोजन सावरोली येथील टाटा स्टील टाउनशिप येथे केले होते. या स्पर्धेत राजिप, रायगड पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी कार्यालय यांनी सहभाग घेतला होता. या क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन खालापूर तहसिलदार अभय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार व गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी केले. यावेळी टाटा स्टीलचे शशी भूषण, एन.सी. महापात्रा, आशिष सोळुंखी, सौरभ शर्मा व भावेश रावल उपस्थित होते.

यावेळी अंतिम सामना राजिप आणि रायगड पोलीस अधीक्षक यांच्यात पार पडला. रायगड पोलीसांनी प्रथम फलंदाजी करत १५ षटकांत ७ गडी गमावून १६७ धावा केल्या. उत्तरादाखल मुख्य कार्यकारी अधिकारी राजिपने ९ षटकांमध्ये १ गडी गमावत १६८ धावा ठोकल्या आणि टाटा स्टील फ्रेंडशिप चषक क्रिकेट स्पर्धेवर नाव कोरले. यावेळी सर्वोत्तम गोलंदाज पोलिसचे नितीन सांगळे, तर फलंदाज राजिपचे किरण डोंगरे हे ठरले.

### रोहित शर्माची शतकी खेळी | विराट कोहलीची ऐतिहासिक कामगिरी

# विजय हजारे चषकात ‘रो-को’चे वादळ

। मुंबई । प्रतिनिधी ।

विजय हजारे चषक स्पर्धेत रोहित शर्माने वादळी खेळी करत शतक झळकावले आहे. या स्पर्धेत मुंबईचा सामना बुधवारी (दि.२४) सिक्कीम संघाविरूद्ध खेळवला गेला. या सामान्यात रोहित शर्मा सलामीला उतरला आणि शतकी खेळी करत संघाला उत्कृष्ट सुरूवात करून दिली. यावेळी रोहित ७ वर्षांनंतर विजय हजारे स्पर्धा खेळण्यासाठी उतरला आहे. तसेच, विराट कोहलीनेही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यावेळी त्याने केवळ १ धाव काढताच इतिहास घडवला. या एका धावेसह विराट सचिन तेंडुलकरनंतर लिस्ट-ए क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा दुसरा भारतीय फलंदाज बनला आहे. तसेच, त्याने या सामन्यात उत्कृष्ट शतक देखील झळकावले आहे. तो १५ वर्षांनी विजय हजारे चषक खेळण्यासाठी उतरला आहे.




जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियममध्ये रोहित शर्मा फलंदाजीला उतरला आणि त्याने दुसऱ्याच चेंडूवर शानदार षटकार खेचत आपले मनसुबे जाहीर केले. यावेळी रोहितचा सामना पाहण्यासाठी १२ हजारहून अधिक लोक उपस्थित होते. रोहित शर्माने आपल्या फलंदाजीने चाहत्यांना निराश केले नाही. २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहितने मुंबईला धमाकेदार सुरुवात करून दिली. त्याने पॉवरप्लेमध्ये ४ षटकार आणि ७ चौकार लगावले. रोहितने २८ चेंडूत ५४ धावा करत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने गियर बदलत पुढच्या ३५ चेंडूत शतक पूर्ण केले. रोहित ६२ चेंडूत ८ चौकार व ८ षटकारांच्या मदतीने शतकी खेळी साकारली. त्यामुळे हे रोहित शर्माचे लिस्ट ए क्रिकेटमधील ३८वे शतक ठरले आहे. या सामन्यात रोहित शर्मा ९४ चेंडूत ११५ धावांवर बाद झाला. त्याच्या या कामगिरीच्या जोरावर मुंबईने ८ गडी राखत विजय मिळवला.

तसेच, विराट कोहली दिल्ली संघाकडून विजय हजारे चषकात खेळत आहे. बुधवारी बंगळुरू येथे दिल्ली आणि आंध्र प्रदेश यांच्यात सामना खेळवला गेला. या सामन्यात केवळ १ धाव काढताच विराटने इतिहास घडवला. तो लिस्ट-ए क्रिकेटमध्ये १६,००० धावांचा टप्पा पूर्ण केला आहे. भारताकडून ही किमया करणारा तो सचिन तेंडुलकरनंतरचा दुसराच खेळाडू ठरला आहे. सचिन तेंडुलकरच्या नावावर लिस्ट-ए क्रिकेटमध्ये एकूण २१,९९९ धावांची नोंद आहे. दरम्यान, लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीचा अर्पित राणा भोपळ्यावर बाद झाला. त्यानंतर विराट व प्रियांश आर्य (७४) यांनी दिल्लीचा डाव सावरला. त्यानंतर विराट व नितीश राणा यांनी १६० धावा जोडल्या. यावेळी विराटने लिस्ट ए क्रिकेटमधील ५८ वे शतक झळकावले आणि सचिन तेंडुलकरच्या (६०) विक्रमाच्या जवळ पोहोचला. या सामन्यात विराट कोहली १०१ चेंडूत १३१ धावा करून बाद झाला. त्यानंतर नितीशने ९ चौकार व २ षटकार खेचून दिल्लीचा विजय पक्का केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)